# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२२० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.२८ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## हा नवा भारत, घरात घुसून मारतो, आजच्याच रात्री सर्जिकल स्ट्राईक...; मोदींचा काँग्रेसवर घणाघात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ जम्मू काश्मीर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज जम्मूमध्ये एका जाहीर सभेला संबोधित करताना शहीद भगतसिंग यांना आदरांजली वाहिली. जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी ही शेवटची सभा असल्याचं म्हटलं आहे. मोदी म्हणाले की, गेल्या आठवड्यात त्यांना जम्मू आणि काश्मीरच्या विविध भागांना भेट देण्याची संधी मिळाली आणि ते जिथेही गेले तिथे त्यांना भाजपाचा प्रचंड उत्साह पाहायला मिळाला.

नरेंद्र मोदींनी काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीवर जोरदार निशाणा साधला आहे. जम्मू-काश्मीरमधील लोक या तीन घराण्यांच्या राजकारणाला कंटाळले आहेत. येथील लोकांना आता दहशतवाद, फुटीरतावाद



आणि रक्तपात नको आहे. त्यांना त्यांच्या मुलांचं चांगले भविष्य आणि शांतता हवी आहे. त्यामुळेच लोक भाजपा सरकारला पाठिंबा देत आहेत. जम्मू-काश्मीरमधील लोकांचा मूड भाजपाच्या बाजूने असल्याचं स्पष्ट झालं आहे असं म्हटलं आहे.

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात २०१६ च्या सर्जिकल स्ट्राईकची आठवण करून दिली. आजच्याच रात्री सर्जिकल स्ट्राईक झाला. भारताने जगाला दाखवून दिलं होतं की, हा नवा भारत आहे, जो घरात घुसून मारतो असं मोदींनी सांगितलं. तसेच काँग्रेसवर सर्जिकल स्ट्राईकचा पुरावा मागितल्याचा आरोप करत आजही काँग्रेस या मुद्द्यावर पाकिस्तानची भाषा बोलत असल्याचं म्हटलं आहे.जम्मूच्या जनतेला विशेष आवाहन करताना पंतप्रधान म्हणाले, इतिहासात यापूर्वी कधीही अशी संधी मिळाली नाही, जी या निवडणुकीत आली आहे. पहिल्यांदाच जम्मू काश्मीरमधील लोकांच्या इच्छेनुसार सरकार स्थापन होणार आहे. ही संधी महत्त्वाची असून ती गमावू नये. भाजपाचे सरकार स्थापन झाल्यानंतर जम्मूतील जनतेचं सर्व दुःख दूर करू. नवरात्री आणि विजयादशमीचा संदर्भ निवडणुकीचे निकाल ८ ऑक्टोबर रोजी, नवरात्रीच्या दिवशी येतील आणि यावेळी विजयादशमी ही एक शुभ सुरुवात असेल असंही म्हटलं.

## दिवट्या आमदार..., पोर्शे प्रकरणावरून सुनील टिंगरे शरद पवारांच्या 'रडार'वर!

### अपघातानंतर सुनील टिंगरेंनी विशाल अग्रवाल यांच्या मुलाला वाचवण्यासाठी केला होता प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८पुणे**

पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणावरून आमदार सुनील टिंगरे पुन्हा एकदा अडचणीत आले आहेत. अपघातानंतर सुनील टिंगरेंनी विशाल अग्रवाल यांच्या मुलाला वाचवण्यासाठी प्रयत्न केल्याचे शरद पवारांनी म्हटले आहे. इतकंच नाही, तर 'तू सोडून गेला ते ठिक आहे. निवडणुकीत तुझा कसा बंदोबस्त करायचा ते करू', असा इशारा शरद पवारांनी दिल्याने टिंगरेंना विधानसभा निवडणूक जड जाणार अशी चर्चा सुरू झाली आहे.

पुण्यातील खराडी येथे एका कार्यक्रमात बोलताना शरद पवारांनी आमदार सुनील टिंगरे यांना फैलावर घेतले. पुण्यातील कल्याणीनगरमध्ये पोर्शे कारने




एका दुचाकीला धडक दिली. यात एक तरुण आणि तरुणी ठार झाले. या घटनेनंतर आमदार सुनील टिंगरे विशाल अग्रवाल यांच्या मुलाला वाचवण्यासाठी पोलीस ठाण्यात गेले होते, असे सांगितले जाते.आमदार सुनील टिंगरेंनी आरोपीला वाचवण्यासाठी प्रयत्न केल्याचा दावा शरद पवारांनी जाहीर कार्यक्रमात केला. त्यामुळे आमदार टिंगरे हे अडचणीत आले आहेत.

**शरद पवार आमदार सुनील टिंगरेंबद्दल काय म्हणाले?**

खराडीत बोलताना शरद पवार म्हणाले, सुनील टिंगरे तू कुणाच्या पक्षातून निवडून आला? हा पक्ष कोणी काढला, सगळ्या हिंदुस्थानला माहिती आहे. त्या पक्षाच्या वतीने तुला संधी दिली. तू सोडून गेला, ते ठीक आहे; निवडणुकीत तुझा कसा बंदोबस्त करायचा ते करू, असा इशारा शरद पवारांनी सुनील टिंगरेंना दिला.शरद पवार पुढे म्हणाले, दोन तरुण मुलांना त्यांनी उडवलं काय, जागच्या जागी त्यांची हत्या काय होते; अशा वेळी जे जखमी झाले, त्यांना मदत करण्याऐवजी हा दिवट्या आमदार पोलीस ठाण्यात जातो आणि चालकाला वाचवतो. यासाठी मते मागितली होती का?, असा संतप्त सवाल पवारांनी टिंगरेंना केला.

मते राष्ट्रवादीच्या नावाने मागितली. शरद पवारांच्या नावाने मते मागितली. आणि लोकांनी श्रद्धेने मतदान केले, त्याचं उत्तरदायित्व या पद्धतीने केलं?, अशा शब्दात शरद पवारांनी आमदार सुनील टिंगरेंना लक्ष्य केले.

## भाजपा मित्रपक्षांना सन्मानाने वागवतो याचं उदाहरण म्हणजे...; सुनील तटकरेंनी थेट पुरावाच दिला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ नवी दिल्ली**

राज्यात महायुतीचे तर केंद्रात एनडीएचे सरकार आहे. केंद्राच्या सरकारमध्ये अजितदादा गटातील एकही खासदाराला मंत्रिपद मिळालेले नाही. तशातच राज्यातील महायुती सरकारमध्येही भाजपा अजितदादा गटाला कमी महत्त्व देत असल्याची टीका विरोधक सातत्याने करत आहेत. या मुद्द्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी सणसणीत उत्तर दिले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांची केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस समितीच्या अध्यक्षपदी शुक्रवारी निवड झाली. त्यानंतर आज सुनिल तटकरे प्रदेश कार्यालयात आले असता त्यांचे ढोलताशांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे महत्व कमी झाल्याच्या कपोलकल्पित बातम्या गेले काही दिवस आमच्या हितचिंतकांनी देण्याचा प्रयत्न केला. मात्र भाजप आपल्या मित्रपक्षांना



सन्मानपूर्वक वागणूक देतो त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे माझी केंद्रीय समिती अध्यक्ष पदावर निवड करण्यात आली आहे. मला जी समिती दिली आहे त्या समितीची जबाबदारी फार मोठी आहे. त्या समितीच्या कामकाजाबद्दल आता सांगणे योग्य नाही. कारण ही समिती लोकसभेच्या अखत्यारीत येते. मात्र या समितीचे काम योग्यरितीने करण्याचे सातत्य माझ्याकडून ठेवले जाईल, असे सुनिल तटकरे म्हणाले.

राज्यात जी विविध महामंडळे आहेत, त्यावर योग्य ती कार्यवाही सुरू आहे. निवड करण्यास विलंब झाला असला तरी काही दिवसातच माझ्या महत्वाच्या सहकाऱ्यांना काम करण्याची संधी मिळेल असा मला विश्वास आहे, असेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.

## नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात विधान सभा निवडणुकीची शक्यता - निवडणूक आयुक्त राजीव कुमार

### आयोगाचा नवा नारा आमचा महाराष्ट्र आमचं मतदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ मुबई**

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्राचा दौरा केल्यानंतर पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगाचे प्रमुख राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेतली. आगामी निवडणुकाबाबत काय तयारी असणार? हे तुम्हाला सांगतो आहे. आमचा महाराष्ट्र आमचं मतदान हा आमचा नारा आहे. लोकशाहीच्या उत्सवात लोक आपलं योगदान देतील अशी आम्हाला अपेक्षा आहे. आपले मत, आपला हक्क ही आपली जबाबदारी आहे. असं निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले.

आम्ही राजकीय पक्षांच्या भेटी घेतल्या. स्थानिक पक्ष, राष्ट्रीय पक्ष यांच्याशी भेटीगाठी घेतल्या. पोलीस महासंचालक, आयुक्त तसंच इतरांचीही भेट घेतली. आम्ही त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत ते निर्देश दिले. आम्ही बसपा, आप, काँग्रेस, मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस एसपी, शिवसेना उबाठा, भाजपा अशा सगळ्या पक्षांची भेट घेतली. या पक्षांनी आम्हाला दिवाळीचा मुद्दा सांगितला. तो महोत्सव लक्षात घेऊन निवडणूक तारीख जाहीर करा अशी विनंती त्यांनी केली. निवडणुकीची तारीख ही सुट्ट्या लक्षात घेऊन ठरवा



अशीही विनंती आम्हाला करण्यात आली.लोकांना मतं देताना कुठलीही अडचण होणार नाही याची दक्षता घ्या. जे मतदार फोन घेऊन येतात त्यांना तो सोडून जाताना आणि परत नेताना अडचणी येतात. त्याची व्यवस्था करावी अशीही विनंती करण्यात आली. पैशांचा गैरवापर, मसल पॉवर रोखण्याचीही विनंती केली. वृद्ध लोकांच्या येण्याची-जाण्याची व्यवस्था करावी अशीही विनंती करण्यात आली. पोलिंग एजंट हा स्थानिक असावा अशीही विनंती करण्यात आली. असंही राजीव कुमार यांनी सांगितलं. फेक न्यूजचा प्रचार आणि प्रसार थांबवावा अशीही विनंती आम्हाला सर्व पक्षांनी केली.

महाराष्ट्र विधानसभेत एकूण २८८ मतदारसंघ आहेत. महाराष्ट्राच्या विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपते आहे. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक त्याआधीच होईल. महाराष्ट्रात ९.५९ कोटी मतदार आहेत. त्यात पुरुष ४.५९ कोटी मतदार आहेत. तर महिला ४.६४ कोटी आहेत. आम्ही तृतीय पंथीय, वृद्ध मतदार, दिव्यांग यांची विशेष व्यवस्था करणार आहोत. वृद्ध मतदारांना मतदान करण्यासाठी आम्ही मत देण्याची विनंती करतो. त्यांना केंद्रात जाणं शक्य नसेल तर घरुन मतदान करण्याची सोय उपलब्ध करुन दिली जाईल. पहिल्यांदा मतदान करणाऱ्या मतदारांची संख्याही महाराष्ट्रात चांगली आहे. १९.४८ लाख मतदार हे नवमतदार आहेत. हे तेच मतदार आहेत जे लोकशाहीला पुढे घेऊन जातील असंही राजीव कुमार म्हणाले.

## शेतीला दिवसा वीज, बिलाची माफी ५ वर्षे; उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ गडहिंग्लज**

राज्यातील ३ ते ७ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपाचे वीजबिल यापुढे शेतकऱ्यांनी भरायचे नाही, मागील बिलही द्यायचे नाही. ४४ हजार शेतकऱ्याच्या वीजबिल माफीचा निर्णय महायुती सरकारने घेतलेला हा निर्णय औटघटकेचा नाही. आता शेतीसाठी दिवसा वीज देणार असून वीजबिलाची माफी यापुढे ५ वर्षे कायम राहिल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

नेसरी येथे जनसन्मान यात्रेनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आयोजित मेळाव्यात ते बोलत होते. प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील, 'गोकुळ'चे संचालक नवीद मुश्रीफ यांची प्रमुख उपस्थिती होती.पवार म्हणाले, शेतकऱ्यांच्या हितासाठीच कांदा व बासुमतीवरील निर्यातबंदी हटविण्याबरोबरच निर्यात मूल्यदेखील हटविले आहे. कापूस व सोयाबीनला अधिक भाव मिळण्यासाठी खाद्यतेलावरील आयात शुल्क वाढवले आहे. हत्ती, बिबटे, गवे, रानडुक्करे आदींपासून होणारी नुकसान भरपाईदेखील वाढविणार आहोत.



आमदार राजेश पाटील म्हणाले, अजित पवार, मुश्रीफ यांच्यामुळेच 'चंदगड'ला १६०० कोटीचा निधी मिळाला. बाबासाहेब कुपेकर, नरसिंगराव पाटील यांचे स्वप्न पूर्णत्वास नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. तरीदेखील काही लोकांना आगडोंब होत आहे, जनताच त्यांना उत्तर देईल.

खासदार तटकरे, शीतल फराकटे यांचीही भाषणे झाली. जयसिंग चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. जानबा चौगुले यांनी स्वागत केले.

**मुश्रीफांची अनुपस्थिती.. अजितदादांचा खुलासा !**

पालकमंत्री मुश्रीफ या कार्यक्रमास उपस्थित नव्हते. त्याबाबत खुद्द अजित पवार यांनीच खुलासा केला. इचलकरंजी येथील पूर्वनियोजित कार्यक्रमामुळेच ते नेसरीला येऊ शकलेले नाहीत. माझ्या परवानगीनेच ते इचलकरंजीला गेले आहेत. त्याबाबत कोणताही गैरसमज नको, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**मुश्रीफांविषयी त्यांना एवढा पोटशूळ का ?**

हसन मुश्रीफ यांनी कोल्हापूर जिल्ह्यात राष्ट्रवादीसाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. जिल्ह्याचा विकास आणि बहुजनांच्या हितासाठीच त्यांनी अजितदादांसोबत जाण्याचा निर्णय घेतला. परंतु, केवळ व्यक्तीद्वेषातूनच 'संसदरत्न' (सुप्रियाताई सुळे) त्यांच्यावर टीका करीत आहेत. मुश्रीफांविषयी त्यांना एवढा पोटशूळ का ? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी केला.

## आनंद दिघे यांना मारले होते, त्यांचा घातपात झाला होता; संजय शिरसाठ यांचा गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८छत्रपती संभाजीनगर**

धर्मवीर आनंद दिघे यांना मारले होते, त्यांचा घातपात झाला होता. हे ठाणे जिल्ह्याला माहीत आहे, असा गंभीर आरोप शिवसेना प्रवक्ते आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे. ज्या हॉस्पिटलमध्ये दिघे उपचार घेत होते ते हॉस्पिटल कायम बंद का करण्यात आले, असा सवाल करत शिरसाट यांनी दिघेचा यांचा मृत्यू का झाला याची चौकशी करण्याची मागणी केली.

संजय शिरसाठ यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिघे यांच्या मृत्यू




प्रकरणात गंभीर आरोप केले आहेत. ठाण्यात प्रत्येक जण दिघे यांचा घातपात झाल्याचा आरोप करतात. दिघे यांना डिस्चार्ज दिला जाणार होता. मात्र डिस्चार्ज द्यायच्या आधीच त्यांचा मृत्यू कसा झाला असा सवाल शिरसाठ यांनी केला आहे.

यावेळी शिरसाठ म्हणाले की गेल्या अनेक वर्षापासून दिघे यांचा मृत्यू कसा झाला याच्याबद्दल आमच्या मनात शंका आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांच्याकडे या प्रकरणात चौकशी करण्यात यावी अशी माझी मागणी असल्याचे शिरसाठ यांनी सांगितले. तसेच इतके वर्ष झाले ते हॉस्पिटल सुरू का झाले नाही ही सर्वांच्या मनात शंका कायम आहे. अनेक हॉस्पिटलमध्ये नेत्याचे मृत्यू झाले आहेत. मात्र ते हॉस्पिटल कधीही बंद झाले नाहीत. मात्र इथेच असे का झाले असा सवाल त्यांनी केला.

## 'मविआ' मध्ये गृहकलह, ठाकरेंना फक्त ४४ जागा, प्रकाश आंबेडकरांचा खळबळजनक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

राज्यात येत्या काही दिवसात विधानसभा निवडणुकाची घोषणा होणार आहे. त्यामुळे प्रत्येक पक्ष आता तयारीला लागला आहे. तर दुसरीकडे महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागावाटपावर चर्चा देखील सुरू झाली आहे. यातच वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मोठा दावा करत जागावाटपावरून महाविकास आघाडीमध्ये गृहकलह सुरू असून ठाकरे गटाला फक्त ४४ जागा मिळणार असल्याचा दावा केला आहे. आंबेडकर यांच्या या दाव्यानंतर राजकीय वर्तुळात अनेक चर्चा उधाण आले आहे.



माध्यमांशी बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांनी ८८ जागांपेक्षा एकही जागा कमी न घेण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस आणि शरद पवार गटाने २४४ जागांवर दावा केला आहे. त्यामुळे ठाकरे गटाला फक्त ४४ जागा मिळणार आहे त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये जागावाटपावरून मोठा पेचप्रसंग निर्माण होऊन राजकारण होणार असल्याचा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

तसेच यामुळे ठाकरे गटाला मोठी अडचण निर्माण होणार आहे कारण शिवसेना एकत्र असताना त्यांना जेवढ्या जागा मिळाल्या होत्या तेवढ्या यावेळी मिळणार का? हे मोठा प्रश्न आहे असं देखील प्रकाश आंबेडकर म्हणाले.तसेच पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात एक सर्व्हे करण्यात आला होता त्यात शिवसेनेच्या ५.३ मतदानापैकी २.७ टक्के मतदान एकनाथ शिंदे यांच्याकडे वळल्याचे समोर आले आहे त्यामुळे जागावाटपामध्ये ठाकरे गटाला झुकते माप न मिळण्याचे हे एक प्रमुख कारण आहे आणि त्यामुळे महाविकास आघाडीत संघर्ष निर्माण होणार आहे. असा दावा देखील त्यांनी यावेळी केला.

## संपादकीय ......

# हरित वायू इंधनाचे स्वागत करू या!

कॉम्प्रेस्ड जैव वायू इंधनाची परिस्थिती विकसित करण्याकरिता आपले केंद्र सरकार अनेक मोठी पावले उचलत आहे. इतकेच नाही तर या क्षेत्रातून दरवर्षी १५ दशलक्ष मेट्रिक टन एमएमटी कॉम्प्रेस्ड जैव वायू इंधनाचे उत्पादन घेण्याचे उद्दिष्टही आपल्या सरकारने समोर ठेवले आहे. केंद्र सरकारने हा उपक्रम प्रामुख्याने सुरू केला तो जीवाश्म इंधनावर आधारित वाहतूक व्यवस्थेला ठोस शाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी. मात्र असे असले तरी कॉम्प्रेस्ड जैव वायू इंधनाच्या पलीकडे मिळणारे अतिरिक्त लाभ आत्ताच दिसू लागले. इथे एक बाब समजून घ्यायला हवी ती म्हणजे आपल्या देशाने निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जनाची स्थिती गाठण्याचे जे महत्त्वाकांक्षी ध्येय समोर ठेवले आहे, ते पूर्ण करण्यात स्वतःचा महत्त्वाचा वाटा देण्याची क्षमता कॉम्प्रेस्ड जैव वायू इंधनात आहे. १५ दशलक्ष मेट्रिक टन इतक्या नैसर्गिक वायू इंधन २०३० सालापर्यंत शहरी वायू इंधन वितरण व्यवस्थेअंतर्गत सीएनजी (टी)/पीएनजी (डी) या श्रेणीत, देशांतर्गत वापर होत असलेल्या नैसर्गिक वायू इंधनाची जागा अगदी सहजतेने घेणार आहे, इतकी याची क्षमता अफाट आहे. या इंधनाचा आणखी एक लाभ म्हणजे जैव वायू इंधन उत्पादन प्रकल्पांमध्ये आंबणकृत सेंद्रिय खताचे अर्थात फोमचे उपउत्पादनही आपल्याला मिळते. याच फोमचा जर का आपण खत म्हणून वापर केला तर त्यामुळे जमिनीतल्या कार्बनच्या कमतरतेची कसर भरून काढता येऊ शकते. यालाच जोडलेली दुसरी गोष्ट फोमच्या वापरामुळे जमिनीतील कार्बनचे प्रमाण वाढल्याने आपसूकच जमिनीतील नायट्रोजन आणि फॉस्फरसचे प्रमाणही वाढणार असल्याने, हेच फोम काही अंशी रायसायनिक खतांसाठी देखील पर्याय ठरू शकते.

या क्षेत्राने आता केंद्रस्थानी असलेले महत्त्वाचे क्षेत्र म्हणून स्थान मिळवले आहे. त्यामुळेच तर पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने देखील जैवभार अर्थात बायोमासच्या खरेदीकरता, जैवभार एकजीवीकरण यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी आर्थिक सहाय्य, जैव वायू इंधन प्रकल्प आणि शहरी वायू इंधन वितरण व्यवस्थेत इंधन वाहून नेणाऱ्या वाहिका जोडणी व्यवस्था उभारण्याकरिता आर्थिक सहाय्याच्या योजना तसेच शहरी वायू इंधन वितरणात जैव वायू इंधनाचे मिश्रित इंधन वितरण बंधनकारक करणारी तरतूद अशा प्रकारच्या योजना आणि उपाययोजनांची आखणीही केली आहे. या क्षेत्रातून मिळू शकणाऱ्या महसुलाचे जे सर्व मार्ग आहेत, ते खरेतर अद्यापही पूर्ण क्षमतेने वाटचाल करू लागलेले नाहीत हे देखील सध्याचे वास्तव आहेच. त्यामुळेच तर अद्यापही या क्षेत्रातून मिळणारे प्रमुख उपउत्पादन असलेल्या फोममधून मिळू शकणारा महसूलही आपल्याला अद्यापपर्यंत पूर्ण क्षमतेने मिळवता आलेला नाही. दुसरीकडे अद्यापही कार्बन पतगुणांकण यंत्रणाही पूर्णपणे स्थापित झालेली नाही. यामुळे कार्बन पतगुणांकनाची निर्मिती आणि चलनीकरणाबाबतही काहीएक प्रमाणात अद्यापही अनिश्चितता निर्माण झाली असल्याची बाबही आपल्याला स्वीकारावी लागेल. आपण जर का उपलब्ध सर्व महसुली स्त्रोतांचे चलनीकरण करू शकलो नाही, तर त्यामुळे पतपुरवठा उपलब्ध करून देणाऱ्या यंत्रणांच्या दृष्टीने काही एका प्रमाणात जोखीम निर्माण होते आणि याचा अप्रत्यक्ष परिणाम या क्षेत्राच्या प्रगतीवर होतो.

अर्थात यामुळे जैव वायू इंधन प्रकल्प व्यवहार्य करणे आणि या संपूर्ण क्षेत्राचा विस्तार करणेही तसे आव्हानात्मक काम झाले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर आपल्या सरकारने जैव वायू इंधनाची उचल सुनिश्चित करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे वायू इंधनाच्या एकूण विक्रीत मोठी वाढ झाली आहे. ही बाब समजून घेण्यासाठी आपण काही आकडेवारी पाहू या. २०२२-२३ या आर्थिक वर्षात वायू इंधनाची विक्री सुमारे १२,००० टन इतकी होती, त्यात आर्थिक वर्ष २०२३ -२४ मध्ये मोठी वाढ होऊन ती १९,००० टनांवर पोहोचली आहे. आता चालू म्हणजेच २०२४-२५ या आर्थिक वर्षातल्या दोन महिन्यांच्या उचलीची आकडेवारी पाहिली तर त्यातून हे सहज लक्षात येते की या आर्थिक वर्षात जैव वायू इंधनाची उचल ही दुपटीपेक्षा जास्त असणार आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊनच सरकारने स्वतःहून पुढाकार घेत, जैव वायू इंधन प्रकल्प आणि शहरी वायू इंधन वितरणव्यवस्थेत इंधन वाहून नेणाऱ्या वाहिका जोडणी व्यवस्था उभारण्याकरिता पाठबळ देण्यासाठीच्या योजना आणल्या आहेत.

# कापसाची पहिली वेचणी ३० ते ३५ टक्के बोंडे फुटल्यावर करावी, कारण...

**विदर्भ प्रजासत्ताक**



राज्यात कापसाची वेचणी सप्टेंबर ते जानेवारी दरम्यान करण्यात येते. कापसाला मिळणारी किंमत ही स्वच्छता, शुद्धता धाग्याची लांबी, मुलायमता या बाबींवर ठरते. स्वच्छ पांढराशुभ्र मध्यम ते लांब धाग्याच्या कापसाला चांगला भाव मिळतो. त्यामुळे कापसाची वेचणी आणि साठवणूक या दोन गोष्टी महत्वपूर्ण ठरतात. या लेखातून समजून घेऊया....




कापसाची वेचणी

कापसाची पहिली वेचणी ३० ते ३५ टक्के बोंडे फुटल्यावर करावी.

१५ ते २० दिवसाच्या अंतराने पुढील वेचण्या कराव्यात.

वेचणीस उशीर झाल्यास कापूस जमिनीवर गळून पडतो, त्यास माती काडीकचरा वाळलेली पाने चिकटतात, त्यादरम्यान पाऊस पडल्यास कापूस ओला होवून पिवळसर पडतो.

कापसाची वेचणी सकाळी ओल्या हवेत केल्याने काडीकचरा व वाळलेली पाने कापसाला चिकटत नाहीत.

संपूर्ण फुटलेल्या बोंडातून कापूस वेचावा, अर्धवट उमललेल्या बोंडातील कापूस वेचू नये.

कापूस वेचताना किडका, पिवळसर तसेच कवडीचा कापूस वेगळा वेचावा व त्याची साठवणूक ही वेगळी करावी.

कापसाची वेचणी करताना कापसाचे धागे तुटू देऊ नयेत. वेचलेल्या कापसात काडीकचरा येऊ देऊ नये.

वेचलेला कापूस ताडपत्री अथवा कापडावर पसरून ठेवावा म्हणजे, त्यात माती काडीकचरा मिसळणार नाही.

कापसाची साठवणूक कशी करावी?

कापसाची साठवणूक कोरड्या व थंड जागेत करावी.

पावसाळी अगर दमट वातावरणात वेचणी केलेला कापूस पिंजण्यापूर्वी चांगला वाळवावा.

वेचलेला कापूस योग्य प्रकारे ऊन देऊन त्यामध्ये कुठलीही कीड नाही याची खात्री करून साठवावा.

कापूस साठवण्यापूर्वी उन्हात वाळवल्याने कापसावरील सेंद्रिय अळीपासून होणारे नुकसान टाळता येते.

साठवणीमध्ये कापूस अधून मधून हलवून त्यात उष्णता निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.

उष्णता निर्माण झाल्यास कपाशीचा दर्जा कमी होऊन बाजार भावही कमी मिळतो.


संकलन : डॉ. कल्याण देवळाणकर, सेवानिवृत्त शास्त्रज्ञ कृषी विभाग




# कोमट पाणी प्यायल्याने रक्तदाब वाढतो का?

दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक

कोरोनापासून अनेकजणं नियमित कोमट पाणी पिताना दिसतात. अनेकांना सकाळी उठल्यावर कोमट पाणी सवय असते. कोमट पाणी गळ्यासाठी आल्हाददायक आणि थंडीत पचनक्रिया सुधारण्यास मदत करतं. अनेकांना वाटतं की, कोमट किंवा गरम पाणी प्यायल्याने रक्तदाब वाढतो आणि बीपी असलेल्या रुग्णांना याचा फटका बसू शकतो. खरंच गरम पाणी बीपीच्या रुग्णांसाठी त्रासदायक असतं का?



कोमट पाणी शरीराला डिटॉक्स करण्यास मदत करतो आणि यामुळे पचनक्रिया सुधारते. कोमट पाणी प्यायल्याने शरीरातील रक्तप्रवाह सुधारतो. सर्दी-खोकल्याने त्रासलेल्यांना कोमत पाणी नियमित प्यावं. यामुळे आरोग्याने अनेक फायदे मिळतात आणि कोणत्याही प्रकारचं नुकसान होत नसल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. कोमट पाणी प्यायल्याने रक्तदाबात कोणताही बदल होत नाही. उच्च रक्तदाब असणारी व्यक्तीही कोमट पाणी पिऊ शकते. यामुळे त्यांना कोणताही त्रास होणार नाही. उच्च रक्तदाब असणाऱ्या रुग्णांनी प्रत्येक ऋतूत पुरेसं पाणी प्यायला हवं. शरीर हायड्रेट राहिलं तर बीपी नियंत्रणात राहण्यास मदत मिळू शकेल. लोक आपल्या कंफर्टनुसार कोमट किंवा साधं पाणी पितात. उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांचा आहार चांगला हवा. पुरेशी झोपही घ्यायला हवी. त्याशिवाय डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधं घ्यायला हवीत. गरम पाण्याने अंघोळ केल्याने रक्त प्रवाह आणि सर्कुलेनशन चांगलं होतं.

# नितीन गडकरींच्या संकल्पनेतून नागपुरात साकारला देशातील पहिला 'बर्ड पार्क'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नागपूर :**

पार्क म्हटले की महापालिकेने तयार केलेल्या उद्यानाची पारंपारिक प्रतिकृती समोर येते, अलिकडे अनेकविध 'पार्क' उभारली जातात, जसे आयटी पार्क, उर्जा पार्क, आणि तत्सम. याच्या नावातच पार्क हा शब्द असतो. पण ना तेथे झाडे असतात न पक्षी, उभ्या असतात फक्त सिमेंटच्या उंच इमारती. त्यामुळे पार्क म्हंटले की खरोखरच पार्क म्हणजे उद्यानच आहे की अन्य काही. पण नागपूरमध्ये नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर उभारण्यात आलेला ' बर्ड पार्क' हा खरोखरच आगळावेळगा आहे. एखाद्या कल्पक लोकप्रतिनिधींनी शहराचा विकास करावयाचे ठरवले तर तो वेगवेगळ्या कल्पना राबवून तो कसा करू शकतो याचे उत्तम उदाहरण हा पार्क ठरावा. नागपूरचे खासदार व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा बर्डपार्क देशातील पहिला आहे व त्यांचे आज थाटात लोकार्पण करण्यात आले.




गडकरी यांच्या संकल्पनेतून आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या पुढाकारातून नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर वर्धा मार्गावरील जामठा क्लोव्हर लिफ येथे हा ऑक्सीजन पार्क साकारण्यात आला आहे. १४.३२ कोटींचा हा प्रकल्प जवळपास २० एकरमध्ये साकारण्यात आला आहे. याठिकाणी केवळ पक्ष्यांसाठी विशिष्ट फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. या उद्यानाचे महत्त्व केवळ ऑक्सिजन (प्राणवायू) देणारा परिसर एवढेच नाही. तर पक्ष्यांच्या विविध प्रजातींसाठी हा परिसर आश्रयस्थान म्हणून उपयुक्त ठरणार आहे. विशेष म्हणजे ८,१०४ प्रकारच्या वनस्पतींसह ११ हेक्टर क्षेत्रफळावर ऑक्सिजन पार्क विकसित करण्यात आला आहे. या प्रकल्पात नैसर्गिक तळ्यांनाही समाविष्ट करून घेण्यात आले आहे.

**स्थापना आणि संकल्पना:** या भागात आढळणाऱ्या पक्ष्यांच्या विविधतेचे निरीक्षण करण्यासाठी तसेच नागरिकांचे मनोरंजन व्हावे म्हणून. हिरवीगार जागा उपलब्ध करून देण्याचा दृष्टीकोन बर्ड पार्क विकसित करण्यामागे होता. विविध प्रकारच्या पक्ष्यांच्या प्रजातींसाठी सुरक्षित आणि नैसर्गिक अधिवास. मध्ये स्थित आहे .नैसर्गिक वातावरण, पार्कचे उद्दिष्ट आहे स्थानिक आणि स्थलांतरित पक्ष्यांच्या लोकसंख्येचे संरक्षण करा. हा उपक्रम करण्यात आला आहे व्यापक पायाभूत सुविधा प्रकल्पामध्ये अतिरिक्त काम म्हणून समाविष्ट केले आहे

**रीड बेड:** तलावाच्या मागे स्थित, हे रीड बेड प्रदान करेल .पक्ष्यांसाठी एक आदर्श निवासस्थान जसे की वॉटरहेन्स, मूरहेन्स आणि रीड वार्बलर, विशेषतः स्थलांतर दरम्यान पक्षांना याच गरज असते.

**बांबुसेटम:** या भागात मूळ भारतीय बांबू मोठ्या प्रमाणात लावण्यात आले आहे. प्रजाती बांबू धूळ आणि ध्वनी प्रदूषण कमी करण्यास मदत करेल,वाहनांचे उत्सर्जन शोषून घेते आणि त्याद्वारे मातीची गुणवत्ता सुधारते

**वृक्षारोपण क्षेत्र:** ६-हेक्टर उद्यानाच्या पलीकडे विस्तारित, हे क्षेत्रामध्ये मूळ झाडांच्या प्रजाती आणि झुडपांचा समावेश असेल. ते आकर्षित करेल वन्यजीव, आवाज आणि धूळ कमी करा आणि हवेची गुणवत्ता वाढववते.

पाम लागवड: तलावाच्या मागे, मूळ भारतीय पाम जसे की, फिनिक्स डेट पाम आणि ताडी पामची लागवड केली जाईल. हे तळवे विविध पक्षी प्रजातीसाठी घरटी उभारण्यात आली आहे. यामुळे सस्तन प्राणी, आणि हॉर्नबिल्स आणि विणकर पक्षी सारख्या प्रजाती आकर्षित होतील.

### काय आहे पार्कमध्ये

लोटस/लिली पॅड तलाव: तलाव विविध कमळांचे घर असेल आणि वॉटर लिली, पाणथळ पक्ष्यांसाठी निवासस्थान प्रदान करते आणि भूमिगत जलचरांचे पुनर्भरण. ते देखील तयार करेल. वाढलेल्या आर्द्रतेसह सूक्ष्म निवास. पाणवठा असल्याने खोलवर रहिवासी आणि स्थलांतरित दोघांनाही आकर्षित करण्याची क्षमता आहे.

# 'मी नाही त्यातली, कडी लाव आतली' हा सिनेमा काढ

## त्यात आरे कॉलनीतल्या रशियन फिल्मस् दाखव!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८मुंबई - :** किरीट सोमय्या आणि त्यांच्या पत्नीने न्यायालयात दाखल केलेल्या अब्रुनुकसानीच्या खटल्यात संजय राऊत उघडा पडला. राऊतला १५ दिवसांची कोठडी सुनावली गेली. या प्रकरणामुळे ४२० संजय राजाराम राऊत हा भामटा आणि झाकणझुल्या रोज सकाळी उठून केवळ खोटे आरोप करतो, भुंकतो. त्याच्यात काहीही सत्य नसतं, हे दिसून आलं. रोज सकाळी उठून भुंकायचं, स्वतःच्या नावाची ब्रेकिंग न्यूज चालवायची. त्यानंतर कोर्टात गेल्यावर तिकडे माफी मागायची, गिडगिडायचं, नाक रगडायचं; पुन्हा दुसऱ्या दिवशी उठून बोंबलत बसायचं. बाहेर छाती धडकून बोलायचं आणि कोर्टात जाताच घाम फुटून चड्डी पिवळी होण्याची सर्व नाटक महाराष्ट्र ओळखू लागला आहे, अशा शब्दात भाजपा आमदार नितेश राणे यांनी संजय राऊतांचे पितळ उघडे पाडले. नेहमी खोटं बोलणाऱ्या संजय राजाराम राऊतला त्याचे घरातील माणसंच गांभीर्याने घेत नाही. म्हणून महाराष्ट्राच्या जनतेने आणि मीडियाच्या मित्रांनी याला किती गांभीर्याने घ्यावं याचा विचार करा, असा सल्ला नितेश राणे यांनी दिला.



# पर्यटनदिनानिमित्त विविध उपक्रमांचे यशस्वी आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती, :** जागतिक पर्यटन दिनानिमित्त आज विविध उपक्रम राबविण्यात आले. यात पक्षीनिरिक्षण, कला प्रदर्शन आणि पथनाट्याचे सादरीकरण करून पर्यटनाबाबत जनजागृती करण्यात आली.

जागतिक पर्यटन दिनानिमित्त शुक्रवारी सकाळी वाजता छत्री तलाव परिसरात ट्रेकिंग आणि पक्षी निरिक्षणाचा कार्यक्रम पार पडला. यात अॅडव्हेंचर हब क्लबचे जयंत वडतकर, मनिष ढाकुलकर यांनी विविध पक्ष्यांबाबत माहिती दिली. आजच्या पक्षी निरिक्षणामध्ये ३५ प्रजातींचे पक्षी आढळून आले. पक्षी निरीक्षकांकडून या पक्ष्यांबाबत सविस्तर वैज्ञानिक माहिती देण्यात आली.

ॲनिमेशन कॉलेजच्या वतीने पेपर शिल्प, कला प्रदर्शनी घेण्यात आली. यात प्रतिभावंत विद्यार्थ्यांनी पेपरपासून तयार केलेल्या गणपतीचे प्रदर्शन भरविण्यात आले. पेपर शिल्पाबाबत प्राचार्य विजय राऊत यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. समाजकार्य महाविद्यालयाच्या युवा पर्यटन क्लबमार्फत इर्विन चौकात पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणातून पर्यटनाबाबत माहिती देण्यात आली. यात सहभागी कलावंताना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्था या आंतरराष्ट्रीय पर्यटन संस्थेद्वारे २७ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिन जाहिर करण्यात आला आहे. या दिनानिमित्त आंतरराष्ट्रीय पर्यटन संस्थेद्वारे घोषवाक्य प्रसिद्ध करण्यात आले आहे. यावर्षी जागतिक पर्यटन दिनाचे पर्यटन आणि शांतता हे घोषवाक्य घोषित करण्यात आले होते. त्यानुसार जागतिक पर्यटनदिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. यातून पर्यटन आणि शांततेचा संदेश देण्यात आला आहे.

पर्यटनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात स्थानिक नागरिकांतर्फे विविध क्षेत्रात उपक्रमशिल कार्यक्रम राबविण्यात येतात. ही आशादायक बाब आहे. यातूनही स्थानिक पर्यटनवाढीसाठी हातभार लागेल, असे मत पर्यटन उपसंचालक विजय अवधाने यांनी व्यक्त केले.




RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २८ सप्टेंबर २०२४ शहर/ग्रामिण


## महाराष्ट्राची उद्योग भरारी कार्यक्रम थाटात संपन्न

# महिलांना एमआयडीसीत प्राधान्याने जागा देणार

### उद्योगमंत्री उदय सामंत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

उद्योग क्षेत्रामध्ये राज्य आघाडीवर आहे. उद्योग क्षेत्रामध्येही स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने महिलांचा टक्का वाढविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी एमआयडीसीच्या क्षेत्रामध्ये स्वतंत्र भूखंड उपलब्ध करुन दिले जातील, असे प्रतिपादन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज येथे केले.महाराष्ट्राची उद्योग भरारी कार्यक्रम आज येथे पार पडला. यावेळी आमदार रवी राणा, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर आदी उपस्थित होते.

श्री. सामंत म्हणाले, संपूर्ण बाजारपेठेचा उद्योग क्षेत्राशी संबंध येतोच. त्यामुळे सामाजिक सक्षमीकरण करताना उद्योग क्षेत्राचा विचार करावाच लागतो. लाडकी बहिण योजनेतून महिलांचे सक्षमीकरण करीत असताना त्यांना मिळालेल्या मदतीतून बाजारपेठेतील आवश्यक वस्तूंची खरेदी होत असल्यामुळे एका दृष्टीकोनातून अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. त्यामुळे राज्याचा आर्थिक कणा मजबूत करण्यासाठी उद्योग क्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे. विदर्भाचा विकास व्हावा यासाठी नांदगाव पेठ येथे पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क उभारण्यात येणार आहे. उद्योग क्षेत्रात सक्षमीकरणाच्या दृष्टीने ही महत्वाची नांदी आहे.

ग्रामीण पातळीवर रोजगार निर्माण करणारी विश्वकर्मा योजना चांगल्या पद्धतीने राबविण्यात येत आहे. या योजनेत ५० हजार नोंदणी झाली, यातील ३० हजार लाभार्थ्यांना किटचे वाटप करण्यात आले. यात ३५ हजार युवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. ग्रामीण पातळीवरील रोजगारासह मोठे उद्योग राज्यात येण्यासाठी उद्योग विभाग कार्य करीत आहे.

राज्यातील एकही उद्योग बाहेर जाऊ दिल्या जाणार नाही. त्यासोबतच गडचिरोली सारख्या जिल्ह्यात स्टील क्षेत्रातील गुंतवणूक होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. येत्या एक वर्षात येथील चित्र बदललेले असेल.

कार्यक्रमात विविध योजनांच्या लाभार्थ्यांना लाभाचे वितरण करण्यात आले. उपेंद्र तोमर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मोनिका उमक यांनी सूत्रसंचालन केले.

## २ ऑक्टोबरपासून 'पीएम जनमन अभियान'चा शुभारंभ

# प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानातून आदिवासी बहुल गावांचा सर्वांगीण विकास

### अभियानात जिल्ह्यातील ३२१ गावांचा समावेश

### –जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती, –** दुर्गम आणि अति दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी 'प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियाना'ला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. या अभियानांतर्गत पायाभूत सुविधांचा विकास यावर भर देण्यात आला असून जिल्ह्यातील ९ तालुक्यांमधील ३२१ आदिवासी गावांचा यात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आदिवासी गावे आणि वाडया–पाड्यांचा सर्वांगीण विकास होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिली.



या अभियानांतर्गत केंद्र सरकारच्या १७ मंत्रालयाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध २५ उपक्रमांचा समावेश असणार आहे. त्याव्दारे सामाजिक, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, उपजीविका यामधील तफावत भरुन काढण्याचा प्रयत्न असणार आहे. तसेच आदिवासी क्षेत्र आणि समुदायांच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासावर भर दिला जाणार आहे.

या अभियानामुळे देशातील ६३ हजार तर महाराष्ट्रातील ४ हजार ९७५ आदिवासी गावांचा कायापालट होणार आहे. यामाध्यमातून राज्यातील आदिवासी बहुल ३२ जिल्ह्यातील १२ लाख ८७ हजार ७०२ आदिवासी बांधवांचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण केले जाणार आहे. या अभियानासाठी आवश्यक निधी केंद्र व राज्य शासनाकडून उपलब्ध होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सन २०२४–२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाची घोषणा केली होती. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच झालेल्या कॅबिनेट बैठकीत या अभियानाला मंजूरी देण्यात आली आहे. येत्या २ ऑक्टोबर २०२४ रोजी झारखंड राज्यातून या अभियानाचा प्रधानमंत्री यांच्या हस्ते शुभारंभ होणार आहे.

प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानात सहभागी प्रत्येक मंत्रालयावर पुढील ५ वर्षात निश्चित करण्यात आलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनुसूचित जमातींचा विकास कृती आराखडा तयार करून उपलब्ध निधीद्वारे त्यांच्याशी संबंधित योजना कालबद्ध पद्धतीने कार्यान्वित करण्याची जबाबदारी असणार आहे. दरम्यान, या अभियानांतर्गत समाविष्ट असलेली आदिवासी गावे पीएम गतिशक्ती पोर्टलवर संबंधित विभागाद्वारे त्यांच्या योजनेतून मॅप केल्या जाईल. तसेच पोर्टलव्दारे पोर्टलचे भौतिक आणि आर्थिक प्रगतीचे परीक्षण केल्या जाईल. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांना पुरस्कारही देण्यात येणार आहे.

'प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियान' जिल्ह्यातील अमरावतीसह अचलपुर, भातकुली, चांदूरबाजार, चिखलदरा, दर्यापूर, धारणी, मोर्शी, वरुड या ९ तालुक्यामधील ३२१ आदिवासीबहुल गावांमध्ये राबविले जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व संबंधित कार्यान्वयन यंत्रणांच्या सहभागातून हे अभियान प्रभावीपणे राबवून या ३२१ गावांचा सर्वांगीण विकास करण्यात येईल, असे प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी सांगितले.

# आरक्षणाच्या मुद्द्यावर गोवारी समाज पुन्हा आक्रमक, नागपुरात शक्तिप्रदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८नागपूर :–** गोवारी समाजाचा आरक्षणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा तो विषय ऐरणीवर आला आहे. गोवारी समाजाला अनुसूचित जमातीमधून आरक्षण मिळावे म्हणून शुक्रवारी गोवारी बांधवांनी नागपुरात मोर्चा काढला. गोवारी जमातीला आदिवासींसाठी असलेले आरक्षण देण्यात यावे यासाठी गोंड गोवारी संवैधानिक हक्क कृती समितीतर्फे हा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात विदर्भातील वेगवेगळ्या जिल्ह्यातून आलेले समाज बांधव सहभागी झाले होते. त्यातील काही लोकांनी झिरो माइल चौकात रस्ता रोको केल्याने पोलिसांनी त्यांना अटक केली. गोवारी समाजाला आदिवासींचे आरक्षण देण्याकरिता नेमण्यात आलेल्या के. एल. वडने समितीचा अहवाल तातडीने जाहीर करावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. नागपुरातील यशवंत स्टेडियम येथून हा मोर्चा निघाला. पोलिसांनी मोर्चा गणेश टेकडी रस्त्यावर अडवला.



२४ एप्रिल १९८५ च्या मार्गदर्शक सुचनांच्या जीआर मधील नमूद गोंड गोवारी जमातीबाबतची चुकीची माहिती सर्वोच्च न्यायालयाने नमूद केलेल्या निकालपत्रातील परिच्छेद क्रमांक ८३ मध्ये नमूद जी गोवारी जमात वाघोबा, नागोबा, ढाल पुजा करतात, ज्यांचे जमात प्रमुख शेंड्या आहे. जन्म, विवाह, मृत्यू संस्कार विशिष्ट पद्धतीचे आहे. त्यांचीच भारत सरकारच्या अनुसूचित जमातीचे यादीत गोंड गोवारी म्हणून नोंद झालेली आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार गोंड गोवारी जमातीची माहितीत सुधारणा करण्यात यावी.सर्वोच्च न्यायालयाच्या १८ डिसेंबर २०२० च्या निर्णयाच्या अधीन राहून संविधानिक आणि वैधानिक तरतुदीनुसार गोंड गोवारी जमातीची संस्कृती व रूढी परंपरा पालन करण्याच्या अर्जदारांना 'गोंड गोवारी' जमातीचे जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र वतरित करण्यासंबधीचे आदेश सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना, उपविभागीय अधिकाऱ्यांना तात्काळ देण्यात यावे, आदींचे समावेश आहे.

### काय आहेत मागण्या

गोवारी समाजाच्यावतीने आरक्षणाच्या मागणीसाठी नागपुरात फेब्रुवारी महिन्यात अनेक दिवस उपोषण करण्यात आले होते. आत त्याच मगाण्यासाठी मोर्चा काढण्यात आला. १४ ऑगस्ट २०१८ पूर्वी आणि नंतर महाराष्ट्रातील गोंड गोवारी जमातीला वितरित करण्यात आलेल्या जात प्रमाणपत्रानुसार अनुसूचित जमातीचे सर्व लाभ देण्यात यावेत. तसेच वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे. गोंड गोवारी जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्राच्या आधारे पदवी आणि इतर उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या अडवून ठेवण्यात आलेल्या शिष्यवृत्ती विनाविलंब देण्यात यावी आणि पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांच्या अडवून ठेवलेले पदवी प्रमाणपत्रे तात्काळ वितरित यावी.

# महसूल अधिकाऱ्यांना धक्काबुकी करून वाळू तस्कर टिप्पर घेऊन पसार

### सावर्डी परिसरातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती – :** अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या दोन टिप्परला महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी अडविले आणि खनिज वाहतुकीचा परवाना मागितला असता टिप्पर चालकांनी अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांसोबत धक्काबक्की करून टिप्पर व वाळू घेऊन तेथून पसार झाले. या घटनेत नांदगाव पेठ पोलिसांनी महिला अधिकारीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.

महसूल विभागाच्या महिला अधिकारी व कर्मचारी महेंद्र कंगाले, आदेश गजभिये, अर्जुन अभोकार, राजेंद्र दंदे आणि मंगेश सोळंके हे २६ सप्टेंबर रोजी सावर्डी परिसरात अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्यावर कारवाई करीत होते. दरम्यान सावर्डी एमआयडीसी परिसरातून टिप्पर क्र. एम.एच. २७डी.जी. ५७७० आणि एम.एच. २७ डी.जी. ५७७० भरधाव येताना दिसताच अधिकाऱ्यांनी त्यांना रोखले आणि एकाच नंबरचे दोन टिप्पर तसेच वाळू वाहतूकीचा परवाना विचारला. तेव्हा त्यांनी परवाना नसल्याचे सांगितले आणि टिप्पर सचिन निस्ताने (वय ३५ रा. मोझरी) आणि मेटांगे (रा. मोझरी) यांच्या मालकीचे असल्याचे सांगितले.

दोघांकडे वाळू वाहतुकीचा परवाना नसल्यामुळे कर्मचाऱ्यांनी दोन्ही टिप्पर जप्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु टिप्पर चालकांनी त्यांच्यासोबत धक्काबुक्की करून वाळूसह टिप्पर घेऊन पसार झाले. त्यामुळे महसुल अधिकाऱ्यांनी नांदगाव पेठ ठाण्यात धाव घेतली आणि घडलेला प्रकार सांगितला. त्या आधारावर पोलिसांनी दोन्ही टिप्पर चालकाविरुध्द गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरु केला.



# शिरजगाव कसबा येथून संत्रा चोरी करणारी टोळी जेरबंद

### सकाळी करायचे रेकी रात्रीला करायचे गेम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८शिरजगाव कसबा**

शेतकऱ्यांच्या शेतातील संत्रा चोरी करणाऱ्या टोळीला शिरजगाव कसबा पोलिसांनी अटक करून गुन्ह्यात वापरलेली एक दुचाकी, दोन चारचाकी आणि प्लास्टीकचे कॅरेट असा एकूण १९ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गजानन उर्फ गुड्डू सुदाम बेठकर (वय २४), अनिल सुकाराम भलावी (वय २३), आनंद उर्फ बंटी रमेश मेटकर (वय २४) आणि गेदालाल कामु उईके (वय २४ सर्व रा. खरपी) अशी अटकेतील चोरट्यांची नावे आहेत.शिरजगाव कसबा ठाण्यांतर्गत सालेपूर येथील रहिवाशी सागर विश्वास शेळके यांच्या शेतातून १३ सप्टेंबर रोजी चोरट्यांनी ४० ते ५० कॅरेट संत्रा चोरी करून नेला होता. याबाबत शेळके यांनी शिरजगाव ठाण्यात तक्रार दिली होती. त्या आधारावर पोलिसांनी चोरट्यांचा शोध सुरु केला असता गुप्त माहितीच्या आधारावर पोलिसांनी चौघांना अटक करून कसून विचारपुस केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. तसेच दिवसभर दुचाकीने शेताची रेकी करायची आणि रात्रीला शेतात जाऊन संत्रा तोडून पीकअप वाहनाने घेऊन जायचे, असे पोलिसांना सांगितले. तेव्हालगेच पोलिसांनी एक दुचाकी, दोन पीकअप व्हॅन आणि ४० प्लास्टीकचे कॅरेट असा एकूण १९ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



या कारवाईत शिरजगाव कसबा ठाणेदार महेंद्र गवई यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक शिंदे, पोलीस अंमलदार नानकराम जावरकर, मनोज पंडीत, अमोल कपले, दीपक डाहे, विनित क्षिरसागर, वैभव मांडवगणे, दीपक गवई, मोहीत चौधरी, अमोल नंदरधने, अर्जुन परिहार, अजय कुमरे, महिला अंमलदार राधीक उघडे आणि रुपाली नांदुरकर यांच समावेश होता.

# १९ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर धामकचे होणार दर्जेदार पुनर्वसन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८नांदगाव खंडेश्वर–** जिल्ह्यातील शेवटचे टोक नांदगाव खंडेश्वर तालुका अंतर्गत येत असलेले धामक गावातील १९ वर्षापासून गाजत असलेला पुनर्वसनाचा मुद्दा व त्यासाठी सुरू असलेल्या संघर्षाला अखेर तब्बल १९ वर्षानंतर न्याय मिळाला असून या विभागाचे आमदार प्रताप अडसड यांच्या प्रयत्नाची पराकाष्टा फलदायी ठरली आहे. आता धामक गावचे दर्जेदार पुनर्वसन करण्याचा निर्णयाला गुरुवारी झालेल्या नियामक मंडळाच्या बैठकीत मंजुरात मिळाली आहे.



धामक गावचे पूर्णतः पुनर्वसन होणार की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. कारण गावचे यापूर्वी बेंबळा प्रकल्प यवतमाळ अंतर्गत २१८ घरांचे अंशतः पुनर्वसन करण्याचा निर्णय झाला होता व तशी कारवाई सुद्धा करण्यात आली होती. त्यामुळे धामक गावचे पूर्णतः पुनर्वसन होणार की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली असताना आमदार प्रताप अडसड निवडून येताच धामक वासियांसाठी पूर्णतः पुनर्वसनाचा आशेचा किरण दिसू लागला व आमदार प्रताप अडसडयांनी धामक गावाला भेट देत हा प्रश्न कुठल्याही परिस्थितीत सोडवणार असा शब्द गावकऱ्यांना दिला होता. जो धामक वासियांचा

यांचा पुनर्वसनाचा प्रश्न शासन दरबारी १९ वर्षे खितपत पडून राहिला त्या पुनर्वसनाशी सातत्य ठेवून अखेर आमदार प्रताप अडसड यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री यांच्याकडे पाठपुरावा करून न्याय मिळवून दिला. त्यामुळे धामक गावात ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून गावात जल्लोष करीत विकासाचा वादा प्रताप दादा अशा घोषणा दिल्या. आमदार अडसड यांच्या माध्यमातून गावच्या पुनर्वसनाचा मुद्दा मार्गी लावण्याकरिता धामक येथील युवा कार्यकर्ते अमोल इंगोले, अक्षय मस्के यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला.



मागील १९ वर्षापासून पूर्णतः पुनर्वसनाचा धामक गावाचा प्रश्न प्रलंबित होता. गावातील नागरिकांनी अनेकदा शासन दरबारी पूर्णतः – पुनर्वसनाची मागणी केली परंतु अनेक अडचणी यामध्ये निर्माण झाल्या होत्या. मात्र मी आमदार होताच विधानसभेत तब्बल ७ वेळा हा प्रश्न उपस्थित करून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून झालेल्या नियमक मंडळाच्या बैठकीत धामक गावचे पूर्णतः पुनर्वसन करण्याचे मंजूर करून घेतले.– **आमदार प्रताप अडसड**

# एटीएम अपडेटचा ग्राहकांना त्रास

## मोर्शी किंवा राजुराबाजारला जाण्याचा दिला जातो मोफत सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ बेनोडा** – वरुड तालुका अंतर्गत येणाऱ्या बेनोडा शहीद येथे सेंट्रल बँकेची एकमेव शाखा आहे. या शाखेचे एटीएम गावात नसल्यामुळे नवीन एटीएम अपडेटसाठी चक्क ग्राहकांना मोर्शी किंवा राजुराबाजार येथे जाण्याचा सल्ला बँकेचे कर्मचारी देत असल्यामुळे आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

बेनोडा शहीद हे गाव शहिदाच गाव म्हणून संपूर्ण राज्यात परिचित आहे. या गावांमध्ये राष्ट्रीयकृत बँकेची एकमेव शाखा आहे. त्यामुळे नागरिकांना याच बँकेत व्यवहार करावे लागतात. काही महिन्यापूर्वी सेंट्रल बँकेचे एटीएम या गावात होते. परंतु अचानक ते एटीएम बंद झाले. ते बंद का झाले याविषयी ग्राहक अनभिज्ञ आहेत. त्यामुळे इंटरनेट बँकिंगसाठी ग्राहकांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे.एटीएम अपडेट करण्यासाठी या गावांमध्ये कसल्याही प्रकारची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे ग्राहकांना २० किलोमीटर अंतरावर असलेल्या राजुरा बाजार येथे किंवा ३५ किलोमीटर अंतरावर असलेल्या मोर्शी येथे जा असा



सल्ला सेंट्रल बँकेचे कर्मचारी ग्राहकांना देत आहेत, त्यामुळे सेंट्रल बँकेच्या या शाखेविषयी आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.त्यामुळे काही ग्राहक या बँकेत व्यवहार बंद करून खासगी बँकेत व्यवहार सुरू करत आहेत, अशी चर्चा आहे. परंतु शासकीय अनुदान व इतर कामे राष्ट्रीयीकृत बँकेतच असल्यामुळे ग्राहकांना नाईलाजास्तव या बँकेत व्यवहार करणे गरजेचे झाले आहे.त्यामुळे ग्राहकांना विनाकारण होत असलेला त्रास सहन करावा लागत आहे तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाला गांभीर्याने घेऊन ग्राहकांच्या सुविधासाठी गावातच डिजिटल एटीएम उपलब्ध करून देऊन ग्राहकांना इंटरनेट बँकिंग साठी सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी परिसरातील ग्राहकांनी केली आहे. आता या मागणीची दखल वरिष्ठ बँक अधिकारी घेणार का, याकडे मात्र सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.

# रस्ता चुकलेली ती मुले सापडली ताजनगरात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** नागपुरी गेट हद्दीतील दोन अल्पवयीन मुले शुक्रवारी सकाळी शाळेत पोहोचले नाही. त्यामुळे आई–वडिल काळजीत पडले. त्यांनी पोलिसांकडे धाव घेऊन याबाबतची माहिती दिली. त्यानंतर ती दोन्ही मुले शुक्रवारी ताज नगर परिसरात एका गल्लीमध्ये मिळून आले.

२७ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास नागपुरी गेट पोलिस ठाण्यात ड्युटी ऑफिसर सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली चव्हाण या कर्तव्यावर हजर असताना, त्यांच्याकडे रुबीना मोहम्मद मंजूर (३०, रा. गुलिस्ता नगर, अमरावती) ही महिला घाबरलेल्या अवस्थेत मिळूनआली.त्यांनी माहिती दिली की, त्यांनी ११ व ९ वर्षीय या दोन्ही मुलांना असोसिएशन उर्दू स्कूल शाळेत पाठवायसाठी घराजवळील गुलिस्ता नगर स्कूलबस थांब्यावर सकाळी ०७.४५ वाजता सोडून दिले. त्यानंतर त्या गेल्या. त्यानंतर त्यांना माहिती पडले की, दोन्ही मुले ही शाळेत पोहोचली नाही आणि घरी सुध्दा परतली नाही. त्यामुळे ते बेपत्ता झाली किंवा त्यांचे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केले. पोलिसांनी वेगवेगळ्या परिसरात त्यांची छायाचित्र लोकांना दाखविली. त्यानंतर सुमारे ३० ते ४० विविध सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून दोन तास मुलांचा कसोशीने तपास केला. दरम्यान ते दोन्ही मुले गुलिस्ता नगर येथील एका सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसले. पोलिसांनी त्या परिसरातील ५० ते ६० रहिवाशांना मुलांचे छायाचित्रे दाखवून शोध घेतला असता दोन्ही मुले हे ताज नगर परिसरात एका गल्लीमध्ये दुपारी १२ वाजताच्या सुमारास गोंधळलेल्या अवस्थेत मिळून आले.

# पाच एकरातील सोयाबीन पिकावर महिला शेतकऱ्याने फिरविला ट्रॅक्टर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ तिवसा–** यंदा निसर्गाचा लहरीपणा सुरुवातीपासून दिसून आला. अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली. काही ठिकाणी बोगस बियाण्याने नुकसानीत भर घातली. तसेच हातातोंडाशी आलेल्या सोयाबीन पिकावर रोग व किडीचा प्रादुर्भाव झाला. त्यामुळे काढणीसाठीही न परवडणाऱ्या सोयाबीन पिकावर तिवसा तालुक्यातील निंभोरा येथील महिला शेतकरी वर्षा देशमुख यांनी आपल्या पाच एकरातील उभ्या सोयाबीनवर ट्रॅक्टर फिरवला आहे.

या वर्षी सुरुवातीपासूनच निसर्गाच्या लहरीपणाचा फटका



शेतकऱ्यांना बसला. सुरुवातीला पेरणी योग्य झालेला पाऊस आणि नंतर पडलेलाखंड, त्यानंतरचे ढगाळ वातावरण यामुळे पिकांची वाढ झाली नाही. त्यातच किडीचा व रोगाचा प्रादुर्भावही कारण ठरला. काढणी परवडणार नसल्याने पीक मोडले : एकंदरीतच उत्पादनापेक्षा पिकाच्या काढणीला येणारा खर्च अधिक असल्याने लाखो रुपये खर्च करूनही पीक हातात येत नसल्याने वर्षा देशमुख यांनी काळजावर दगड ठेवत पाच एकरातील सोयाबीन मोडण्याचा निर्णय घेतला.

सोयाबीन लागवडीसाठी आलेला खर्च : सोयाबीन मागणीन पिकासाठी लागलेल्या खर्चात नांगरणी ७ हजार, व्ही पाससाठी ७ हजार, रोटाव्हेटर आणि बियाणे २० हजार, खते आणि पेरणी ११ हजार, तणनाशक फवारणी, पीक वाढीस औषध, मजुरी ३० हजार, यासह इतर खर्च असा मिळून जवळपास एक ते दीड लाखांचा खर्च आला.

### तालुक्यात लवकरच होणार सर्वेक्षण

तिवसा तालुक्यात सोयाबीन पिकांवर आलेला रोग, तसेच अतिवृष्टीने पिके पिवळे पडून खराब झाले आहेत. याबाबत लवकरच वरिष्ठांच्या आदेशानुसार तालुक्यात सर्वेक्षण केल्या जाईल. शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात झालेल्या नुकसान भरपाईसाठी प्रयत्न करण्यात येईल.

**नीलेश राठोड**, तालुका कृषी अधिकारी, तिवसा.

# अमरावती तहसील कार्यालयात चोरी

## मुद्रांक विभाग, दुय्यम निबंधकांचे दालन फोडले

### अनेक युपीएस व बॅटरी चोरी, जुन्या रेकार्ड रूममधील अलमारीचे दार तोडले

### महत्वाचा रेकार्ड चोरीला गेल्याचा संशय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** अज्ञात चोरट्यांनी व मध्यरात्रीच्या सुमारास अमरावती तहसिल कार्यालयातील अभिलेख कक्षाचे मुख्य दाराचे कुलूप तोडले. तसे नोंदणी मुद्रांक विभाग व सहाय्यक दुय्यम निबंधकांचे दालन फोडून युपीएस व बॅटरी लंपास केली. परंतु, चोरट्यांनी जुन्या रेकार्ड रूममधील कपाटाचे दार तोडल्याने महत्वाचा दस्ताऐवज चोरी करण्यासाठी ही चोरी झाली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. २७ सप्टेंबर रोजी ही घटना उघड होताच चांगलीच खळबळ उडाली.कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील श्याम चौकातील डाक भवनाला लागून अमरावती तहसिल कार्यालय आहे. कार्यालयातील शिपाइ कर्मचारी हे नेहमीप्रमाणे सकाळी ९.३० वाजताच्या सुमारासकार्यालयउघडण्यासाठी आले असतात्यांना तहसिल कार्यालयातील अभिलेख कक्षाच्या मुख्य व्दाराचे कुलूप तुटलेले दिसले. तसेच बाजूला असलेल्या नोंदणी मुद्रांक विभाग व सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग–२ (ग्रामीण)



यांच्या दालनाचे कुलूप सुध्दा तुटलेले दिसले. तेथूनच जवळ असलेल्या जुन्य रेकार्ड रूममधील अलमारी उघडली दिसली आणिअलमारीतील संपूर्ण रेकार्ड अस्तव्यस्त झालेला दिसल्याने शिपायांनी तातडीने याबाबत वरिष्ठांना माहिती दिली. तहसिल कार्यालयातील मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर यांनी याबाबत कोतवाली पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच कोतवालीचे ठाणेदार मनोहकर कोटनाके तातडीने ताफयासह घटनास्थळी दाखल झाले. तसेच येथे श्वान पथक, ठसे तज्ज्ञ, फॉरेन्सीक टीमला सुध्दा प्राचारण करण्यात आले.

चौकशी दरम्यान अभिलेख कक्ष, नोंदणी मुद्रांक विभाग, सहाय्यक दुय्यम निबंधकाच्या दालनातील युपीएस व बॅटरी चोरीला गेल्याचे समोर आले. परंतु, रेकार्ड रूममधील अलमारातील रेकार्ड अस्तव्यस्त दिसल्याने तहसिल कार्यालयातील रेकार्डही गायब करण्यात आला असावा, असा संशय व्यक्त करण्यात येत आहे. नेमका कोणता रेकार्ड गायब आहे, हे रेकार्डची संपूर्ण तपासणी झाल्यानंतर सांगण्यात येईल, असे मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर यांनी पोलिसांना सांगितले. तहसिल कार्यालयात सीसीटीव्ही नसलेल्या भागातच चोरी झाल्याने – परिसरात अनेक तर्क–वितर्क व्यक्त करण्यात येत – आहे. तुर्तास याबाबत पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात चोरी, घरफोडीचा गुन्हा दाखल – केला असून पोलिसांनी यध्दपातळीवर चोरट्यांची शोधमोहीम सुरू केली आहे.

### दै. हिंदुस्थानच्या प्रभा अरुण मराठे यांचे द्वितीय स्मरणार्थ

# प्रभास सन्मान २०२४ ‘समर्पण प्रतिष्ठान’ ला घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** दै.हिंदुस्थानच्या आधारवड प्रभा अरुण मराठे यांच्या द्वितीय पुण्यस्मरण निमित प्रभा अरुण मराठे सामाजिक सेवा पुरस्कार अर्थात प्रभास सन्मान अमरावती जिल्ह्यातील मालधूर (गुरुकुंज मोझरी) येथे समाजातील शोषित, पिडीत व निराधार महिलांकरीता गेल्या १५ वर्षांहून अधिक काळापासून कार्य करणाऱ्या समर्पण प्रतिष्ठान या सामाजिक सेवा प्रकल्पास जाहीर करण्यात आला.




समर्पण प्रतिष्ठानचे संचालक अमोल मानकर यांच्या अथक परीश्रमाने व समर्पित कार्याने गेल्या १५ वर्षात जवळपास ७ हजारहून अधिक निराधार व पिडीत महिलांना आधार मिळाला व सक्षमपणे आयुष्य जगण्याचा मार्ग देखील सापडला. अमोल मानकर यांच्या माध्यमातून समर्पणच्या कार्यकर्त्यांची एक मोठी फळी सबंध महाराष्ट्रभर कार्य करतेअनेक ठिकाणी निराधार महिलांकरीता वसतीगृहे, त्यांना सक्षम करणारी विविध केंद्रे या माध्यमातून समर्पण प्रतिष्ठानचे कार्य चालते. विशेष म्हणजे महिला सक्षमीकरण व पुनर्वसना करीता संबंध महाराष्ट्रातून एकत्र आलेल्या तरुण तरुणींची संस्था असा समर्पण प्रतिष्ठानचा उल्लेख करावा लागे. बरेच वेळा तरुणाईच्या वाईट बाबींबद्दल बोलले जाते. परंतु समर्पण प्रतिष्ठानद्वारा आयोजित कबीर या प्रकल्पांतर्गत तरुण तरुणींकरीता विविधशिबीरे आयोजित केली जातात. ज्याद्वारे हेच तरुण पुढे समर्पण प्रतिष्ठानचे कार्यकर्ते बनून महिला सक्षमीकरणाकरीता कार्य करतात. 'माहेर' उपक्रमांतर्गत पीडित स्त्रियांना त्यांच्या समस्यांचे निराकरण होईपर्यंत आधार दिला जातो तसेच समुपदेशन, कायदेविषयक मदत, मार्गदर्शन, व्यावसायिक प्रशिक्षण अश्या विविध प्रकारे पुर्वसनाचे कार्य फार प्रभावीपणे केले जाते. मातृऋण उपक्रमांतर्गत ४५ वर्षावरील माता भगिनींवर होणाऱ्या अत्याचारानंतर त्यांच्या आयुष्याकडे बघण्याचा समाजाचा चुकीचा दृष्टीकोन व त्यांच्यामध्ये उमेद नसल्याने त्यांना कायमस्वरुपी सन्मानाने निवारा मिळावा या उद्देशाने कार्य केले जाते. पुरस्काराच्या निवडीकरीता ज्या निवडसमितीने कार्य केले त्यामधे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील, यवतमाळचे अनंत कौलगीकर, नागपूरचे पराग पांढरीपांडे, अमरावतीच्या अनुराधा आळशी व प्रा. सावन देशमुख यांचा समावेश होता. समितीने केलेली निवड मराठे परीवाराने सहर्ष स्विकारून अमोल मानकर यांच्या समर्पण प्रतिष्ठानला हा स्व. प्रभा अरुण मराठे सामाजिक सेवा पुरस्कार घोषीत केला. या पुरस्कारामधे रुपये २५००० सहयोग राशी, मानपत्र तसेच सन्मान चिन्हाचा समावेश आहे. हा पुरस्कार याआधीच ठरल्या प्रमाणे स्व. अरुण बा. मराठे यांच्या पुण्यस्मरण दिवशी म्हणजे २० नोव्हेंबर रोजी एका देखण्या समारंभाच्या माध्यमातून प्रदान केला जाणार आहे.

# माझी वसुंधरा अभियान ४.० मध्येचांदूर रेल्वे न.प. ने पटकाविले ५० लक्ष रूपयांचे बक्षिस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती** माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये १५ हजार ते २५ हजार लोकसंख्येच्या गटात चांदूर रेल्वे नगरपरिषदने अमरावती विभागातून तिसरा क्रमांक पटकावित ५० लक्ष रूपये बक्षिसाचे मानकरी ठरले आहे. पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित रमाझी वसुंधरा अभियानर हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २ ऑक्टोबर, २०२० ला राबविण्यास सुरूवात झाली होती. रमाझी वसुंधरा अभियान ४.०१ हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १ एप्रिल, २०२३ ते ३१ मे, २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर अभियान कालावधीत केलेल्या कामाचे




डेस्कटॉप मुल्यमापन वफिल्ड मुल्यमापन त्रयस्त यंत्रणांमार्फत करण्यात आले. या दोन्ही मुल्यमापनातील एकूण गुणांच्या आधारे माझी वसुंधरा अभियान ४.० मधील लोकासंख्यानिहाय विजेत्या संस्थाची २७ सप्टेंबर रोजी निवड करण्यात आली. यात अमरावती विभागातून नगरपरिषद, चांदूर रेल्वेने तिसरा क्रमांक पटकावून ५० लक्ष रुपये पारितोषिक रक्कम प्राप्त केले आहे. याकरिता मुख्याधिकारी डॉ. विकासखंडारे, आरोग्यनिरीक्षक राहुल इमले, लेखापाल संदीप माहुरे, रचना सहायक आशिष कुकळकर, कर निरीक्षक शारदा कावडे, संगणक अभियंता योगेश वासनिक, पाणीपुरवठा अभियंता परिमल देशमुख, लिपीक जितेंद्र कर्से, कर्मचारी विशाल सुरकार, राजेश शिर्के, अनंत वानखडे, पंकज इमले, मनीष कनोजे, संगीता इमले, संजयकर्से, शहर समन्वक पल्लवी जामोदकर व इतर कर्मचारीवृंदयांनी अथक परिश्रम घेतले.

# आयएनएसच्या कार्यकारीणीवर विलास मराठे बिनविरोध

### अध्यक्षपदी एम. व्ही श्रेयाम्स कुमार, डेप्युटी प्रेसिडंट पदावर विवेक गुप्ता तर उपाध्यक्षपदी करण दर्डा डॉ. विजय दर्डा, प्रतापराव पवार, किरण ठाकुर, योगेश जाधव कार्यकारीणवर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती** – देशातील वृत्तपत्र मालकांची सर्वोच्च संस्था इंडियन न्युज पेपर सोसायटी नवी दिल्लीच्या (आयएनएस) कार्यकारणी त दै. हिदुस्थानचे प्रबंध संपादक विलास अरूण मराठे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सोसायटीच्या अध्यक्षपदी मातृभूमी केरळ चे एम. व्ही श्रेयाम्स कुमार यांची एकमताने निवड करण्यात आली. डेप्युटी प्रेसिडेंट पदी सन्मार्ग कोलकाता चे विवेक गुप्ता तर उपाध्यक्षपदी दै. लोकमत चे करण राजेंद्र दर्डा यांची निवड करण्यात आली आहे.आयएनएस ची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार २७ सप्टेंबर रोजी आयएनएस च्या नवी दिल्ली येथील कार्यालयात पार पडली. या ठिकाणी कार्यकारणीची सदस्य, अध्यक्ष व पदाधिकारी निवडीची प्रक्रिया पार पडली. या सभेत विलास अरूण मराठे यांनी कार्यकारीणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली. कार्यकारीणीत दै. लोकमत वृत्तपत्र समुहाचे अध्यक्ष माजी राज्यसभा अध्यक्ष डॉ. विजय दर्डा यांचा देखील समावेश आहे. याशिवाय सकाळ वृत्तपत्र समुहाचे प्रमुख प्रतापराव पवार, बेळगाव तरूण भारत चे समूह प्रमुख, सल्लागार किरण ठाकुर, दै. पुढारी कोल्हापुरचे डॉ. योगेश जाधव आदी सन्मानित सदस्यांचा समावेश आहे.नवीन कार्यकारणी मध्ये खजिनदार म्हणून दै. अमर उजाला चे तन्मय माहेश्वरी यांची निवड करण्यात आली. सेक्रेटरी जनरल म्हणून मेरी पॉल या काम पाहणार आहेत.नूतन कार्यकारीणीत एस. बालसुब्रम्हण्यम आदित्यन (डेली थान्थी), गिरीष अग्रवाल (दै. भास्कर), समाहित बल (प्रगतीवादी), समुद्र भट्टाचार्य (हिदुस्थान टाईम्स पाटणा), पद्मभुषण होरमुसजी एन. कामा (मुंबई समाचार), गौरव चोप्रा (फिल्मी दुनिया), विजय कुमार चोप्रा (पंजाब केसरी जालंधर), डॉ. विजय जवाहरलाल दर्डा (लोकमत नागपुर), पद्मश्री जगजीत सिग दर्दी (चर्दीकला डेली), विवेक गोयंका



(दि इंडियन एक्सप्रेस मुंबई), महेंद्र मोहन गुप्ता (दै. जागरण), प्रदीप गुप्ता(डाटा बेस्ट), संजय गुप्ता (दै. जागरण वाराणसी), शैलेश गुप्ता (मिड–डे), शिवेंद्र गुप्ता (बिझनेस स्टैंडर्ड), डॉ. योगेश जाधव (पुढारी), सरविदर कौर (अजीत), डॉ. आर. लक्ष्मीपथी (दिनमल्लार), विलास अरूण मराठे (दै. हिदुस्थान अमरावती), हर्ष मॅथ्यू (वनिथा), अनंत नाथ (गृहशोभिका), पी. व्ही निधीश (बालाभुमी), प्रताप गोविद पवार (सकाळ), राहूल राजखेवा (दि सेंटिनल), आर.एम. आर. रमेश (दिनकरन), अतीदेव सरकार (दि टेलीग्राफ), पार्थ पी. सिन्हा (नवभारत टाइम्स), प्रविण सोमेश्वर (दि हिदुस्थान टाईम्स), किरण डी. ठाकुर (तरूण भारत, बेळगाव), बिजू वर्गीस (मंगलमप्लस), आय. व्यंकट (इनाडू), पद्मभूषणकुंदन आर. व्यास (व्यापार–जन्मभूमी), के.एन. तिलककुमार (डेक्कन हेराल्ड व प्रजावाणी), रविद्र कुमार (दि स्टेट्समन), किरण बी. वडोदरीया (वेस्टर्न टाईम्स), सोमेश शर्मा (राष्ट्रदुत जयपुर), जयंत मेमन मॅथ्यू (मलयाला मनोरमा), एल. अदिमुलम (हेल्थ अँड द अँटीसेप्टीक), मोहित जैन (इकॉनॉमिक टाईम्स), के. आर. पी. रेड्डी (साक्षी), राकेश शर्मा (आजसमाज) यांचा समावेश आहे.

# नितेश राणेंच्या दौऱ्यामुळे अचलपूरात हाय अलर्ट जिल्ह्याभरातील पोलीस आज होणार दाखल

## एसआरपीएफची तुकडीही तैनात : पोलिसांचे समाजमाध्यमांवर लक्ष



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८ अचलपूर

आपल्या प्रक्षोभक भाषणामूळे अल्पसंख्याक समुदायाकडून ज्यांचा प्रचंड विरोध होत आहे, असे भाजपचे नितेश राणे २९ सप्टेंबर रोजी अचलपूर दौऱ्यावर असल्याने दोन समुदायात तणाव निर्माण होण्याची भीती निर्माण झाली आहे. ज्यामूळे जिल्ह्याभरातील पोलीस उद्या शनिवारी अचलपूरात दाखल होणार आहे. सोबतच एसआरपीएफ तुकडी लावाजमासह

अचलपूरात दाखल होत आहे. सोबतच शहर, जिल्हा पोलिसांकडून सर्व समाजमाध्यमांवर लक्ष ठेवले जात आहे. जेणे करुन कुणीही सांप्रदायिक हिंसा होईल असे चिथावणीखोर वक्तव्य करणार नाही. अचलपूरसह परतवाडा शहरात पोलिसांचा हाय अलर्ट आहे.भाजप आमदार नितेश राणे यांनी नुकतेच वादग्रस्त वक्तव्य केले होते. ज्यामूळे अल्पसंख्याक समुदायांमध्ये रोष पहायला मिळाला. काही झाले तरी नितेश राणे यांना अचलपूरात येवू देणार नाही अशी भूमिका एका गटाने घेतलेली असताना, आम्हाला कोण अडविणार असे आव्हान देत रविवार (२९ सप्टेंबर) रोजी हिंदुत्ववादी संघटनांनी अचलपूर शहरातून नितेश राणे यांच्या बाईक रॅलीचे आयोजन केले आहे. ज्यामूळे अचलपूर सांप्रदायिक बारुदीचा ढीगारा बनले आहे, ज्यावर वादाची एक ठिणगी पेट घेवू शकते. हा प्रकार टाळण्याकरिता पोलीस प्रशासनाने आपली पुर्ण ताकद खर्ची घातली आहे. दोन्ही गटांना आवरण्याकरिता शर्थीचे प्रयत्न केले जात आहे.

### तीन ठाण्यांचे आज शक्तीप्रदर्शन

अचलपूर, सरमसपूरा व परतवाडा पोलिसांकडून उद्या शनिवारी आपआपल्या क्षेत्रात शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे. १०० हून अधिक पोलीस वाहनेही अचलपूरात दाखल होणार असल्याची माहिती आहे. पुढील दोन दिवस अचलपूरसह परतवाड्यात पोलिसांचा हाय अलर्ट आहे.

### ४०० हून अधिक पोलीस तैनात

४३ अधिकाऱ्यांसह २५० हून अधिक पोलीस अंमलदार व इतर तुकड्या पकडून ४०० पोलीस अचलपूर, परतवाड्यात तैनात करण्यात येणार आहे. कुणीची समाजमाध्यमांवर चिथावणीखोर संदेश प्रसारित करु नये किंवा वक्तव्य करु नये असे आवाहन पोलीस विभागाकडून करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्याभरात कलम १६३ बिएनएस नुसार पुढचे दोन दिवस प्रतिबंधात्मक आदेश दिले पारित केले आहे.

# शहरात ४९२ दुर्गा, १०२ शारदा देवींची स्थापना

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८ अमरावती

३ ऑक्टोबर पासून नवरात्रोत्सवाला सुरुवात होत आहे. त्यामुळे नवदुर्गा व शारदा देवी मंडळांच्या जय्यत तयारी सुरु झाल्या आहेत. अमरावती शहरातील दहा पोलिस ठाण्याच्या हद्दीत यंदा ४९२ दुर्गा तर १०२ शारदा देवी मुर्तीची स्थापना होणार असून, ६४ ठिकाणी रास गरबा खेळला जाणार आहे. या अनुषंगाने पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले असून, महिलांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने चोख बंदोबस्त लावण्यात येणार आहे.नवरात्रोत्सवाचा दरवर्षी उत्साह शिगेला पोहोचतो. खास करून महिलांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळते. नवदुर्गा व शारदा देवी मंडळांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. विशेष म्हणजे नवरात्रोत्सवात रास गरबा खेळला जात असल्याने तरुणाईमध्ये आनंदाचे वातावरण असते.

## ६४ ठिकाणी गरबा रासचे आयोजन



### पोलिस ठाणे निहाय दुर्गा व शारदा मंडळ

| स्टेशन | दुर्गा | शारदा | गरबा रास |
|---|---|---|---|
| राजापेठ | ५९ | ०५ | २२ |
| कोतवाली | २२ | ०० | ०७ |
| खो. गेट | ५९ | ०९ | ०९ |
| भातकुली | १९ | २४ | ०० |
| गाडगेनगर | ८० | ०६ | ०६ |
| वलगाव | ३१ | २० | ०० |
| नागपुरी गेट | २६ | ०२ | ०० |
| फ्रेजरपुरा | ७५ | १८ | १२ |
| बडनेरा | ८० | ०६ | ०६ |

ऑक्टोबरपासून अश्विन नवरात्रीला सुरुवात होत आहे. या अनुषंगाने पोलीस प्रशासनही सज्ज झाले आहे.

### गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई

कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलिसांनी गुन्हेगार प्रवृत्तीवर विशेष लक्ष केंद्रीत केले असून, गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाया सुरु केल्या आहेत. गुन्हेगार प्रवृत्तींच्या लोकांना कडक सुचना देण्यात येत आहे. तसेच या उत्सवाच्या काळात पोलिसांची गस्त वाढविण्यात येणार आहे. दामिनी पथक महिलांच्या सुरक्षेसाठी सज्ज करण्यात आल्या आहेत.

### सीसीटीव्ही अनिवार्य

महिलांच्या सुरक्षेला प्राधान्यसीसी टीव्ही फोटो घेणेनवरात्रोत्सवाच्या अनुषंगाने सीपी नवीनचंद्र रेड्डी यांनी नुक्तीच बैठक घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस अधिकारी तथा दुर्गोत्सव मंडळांना विविध सुचना केल्या आहेत. अंबा देवी व एकविरा देवी मंदिरावर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रीत केले असून, या परिसरावर सीसीटीव्ही कॅमेयांचा सर्वाधिक वॉच राहणार आहे.

# मधुबन वृध्दाश्रमात संजय बंड यांचा जयंतीदिन साजरा

## बंड परिवार, आशिष धर्माळे मित्र मंडळाचे आयोजन



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२९ अमरावती

लोकनेते स्वर्गीय संजय बंड माजी आमदार यांच्या जयंतीनिमित्त आज २७ सप्टेंबर रोजी मधुबन वृद्धाश्रम या ठिकाणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट तसेच बंड परीवार आशिष धर्माळे मित्र मंडळ यांच्या वतीने मधुबन वृद्धाश्रम या ठिकाणी वाटप करण्यात आले. लोकनेते संजय भाऊ बंड हे आमदार असताना सामाजिक कार्यात त्यांचं मोठे योगदान होतं त्यांनी केलेल्यायोगदान आणि त्यांनी केलेली काम ही कायमस्वरूपी जिवंत राहावी याच उद्दिष्टाने आज त्यांच्या जयंती निमित्त मधुबन वृद्धाश्रमासह इतर ठिकाणी कार्यक्रम करण्यात आला यावेळी उपस्थित शिवसेना जिल्हाप्रमुख शयाम देशमुख, शिवसेना शिवसेना तालुकाप्रमुख अशीष धर्माळे, नगरसेवक ललित जंजाळ, अमरावती युवासेना महानगरप्रमुख राहुल माटोडे, कार्तिक गजभिये, आशिष दारोकार, विक्रम लाड, अमोल तसरे, जनता भगत, दिलीप पाटील ठाकरे, रवींद्र काळबांडे, संजय शेटे,सुनील राऊत उपस्थित होते.

# २४ तासांमध्ये तीन मंडळांत अतिवृष्टी पावसाचा पिकांना फटका

## नऊ तालुक्यांत पावसाची सरासरी पार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८अमरावती

जिल्ह्यात २४ तासांत सरासरी २४.१ मिली पावसाची नोंद झाली. यामध्ये तीन महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. शिवाय, सार्वत्रिक पावसाची नोंद झाली असली तरी तीन तालुक्यांत दमदार पाऊस झालेला आहे. या पावसाने पिकांना फायदा होण्याऐवजी नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांची माहिती आहे. पावसाने खरिपाच्या पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावल्या जात आहे.

जिल्ह्यात चुर्णी ९२ मिमी, शिराळा ८५ व कुन्हा मंडळात ६५.८ मिमी पाऊस २४ तासांत झाला आहे. शिवाय, चिखलदरा तालुक्यात ४९.१ मिमी, अमरावती ४०.७ व तिवसा ५०.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. नांदगाव खंडेश्वर व चांदूर रेल्वे तालुक्यात हलक्या स्वरूपाचा व उर्वरिततालुक्यांत दमदार पाऊस झाला आहे. या पावसामुळे शेतात पाणी साचून उभ्या पिकांचे नुकसान होत असल्याने सरासरी उत्पन्नात कमी येणार आहे.त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. जिल्ह्यात १ जून ते २७ सप्टेंबर यादरम्यान पावसाची ८४६.७ मिमी सरासरी अपेक्षित असतांना प्रत्यक्षात ८१०.२ मिमी पाऊस झाला. ही ९५.७ टक्केवारी आहे. गतवर्षी याच दिनांकाला ५८८ मिमी पावसाची नोंद झाली होती. ही ६९.५ टक्केवारी होती.



### २८ घरांची पडझड, शेतात साचले पाणी

२४ तारखेला ११, २५ तारखेला ६ व २६ तारखेला ११ घरांची पडझड व ८ हेक्टर पिकांचे नुकसान झाल्याचा जिल्हा प्रशासनाचा प्राथमिक अहवाल आहे. भातकुली, चिखलदरा, अंजनगाव सुर्जी, अमरावती, दर्यापूर व अचलपूर तालुक्यात नुकसान झाले आहे.

### कपाशीची बोंडसड, सोयाबीन कुजले

सततचा पाऊस व अतिवृष्टी यामुळे कपाशीवर बोंडअळी व बोंडसडचा प्रादुर्भाव होत आहे. शिवाय, शेतात पाणी साचल्याने सोयाबीन जागेवरच कुजत आहे. तुरीवर बुरशीजन्य रोगामुळे 'मर' रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे.

# त्या अल्पवयीन मुलीला जबरीने फूस लावून पळवून नेणाऱ्यांवर कठोर कारवाई करा : रविराज देशमुख

## शिरजगाव (मोझरी) येथील १६ वर्षीय मुलीसोबत बालविवाह करून फसवणूक रविराज देशमुख यांच्या अमरावती पोलीस अधीक्षक यांना निवेदनाद्वारे कारवाईच्या सूचना



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८शिरजगाव (मोझरी)

येथील १६ वर्षीय मुलीला जबरीने फूस लावून पळवून नेण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून तिला पळवून नेणाऱ्या व त्यांना मदत करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आज भाजपा ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व प्रदेश कार्यकारिणी सदस्य रविराज देशमुख यांनी अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सदर मुलगी हि रामगाव (रामेश्वर) ता. दारव्हा येथे तिच्या मामाकडे शिक्षण घेत होती, दरम्यान ओंकार डहाके याने तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तिला जबरीने फूस लावून पळविले व तिच्याशी बालविवाह केला. यासंदर्भात मुलीच्या नातेवाईकांनी दिनांक ०१ एप्रिल २०२४ रोजी मंगरूळ पीर पोलीस स्टेशनला तक्रार केली असूनहि तब्बल पाच महिने उलटल्यानंतरही दोषींवर कुठलीच कारवाई अजूनपर्यंत करण्यात आली नाही. सदर समस्या मुलीच्या नातेवाईकांनी रविराज देशमुख यांच्याकडे मांडताच त्यांनी तात्काळ अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक यांना निवेदनाच्या माध्यमातून दोषींवर कथोरे कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असून लवकरात लवकर त्या अल्पवयीन मुलीला तिच्या आई वडिलांच्या स्वाधीन करावे, अशी मागणी सुद्धा केली.

तिवसा मतदार संघातील आमच्या लेकीला सुखरूप तिच्या आई वडिलांकडे स्वाधीन करू: रविराज देशमुख अल्पवयीन मुलीला अशा पध्दतीने फसवून तिच्याशी बळजबरीने बालविवाह करणे, हे अतिशय निंदनीय आहे. तिवसा मतदार संघातील आमच्या लेकीला आम्ही सुखरूप तिच्या आई वडिलांकडे सोपविण्यासाठी राज्याचे गृहमंत्री व उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र जी फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करणार असून, दोषींवर कठोर कारवाई करण्यासाठी सुद्धा गृहमंत्र्यांकडे या निवेदनाद्वारे मागणी केली आहे. आणि यापुढेही आमच्या लेकींवर अत्याचार करणाऱ्या समाजकंटकांना आम्ही कदापिही सोडणार नाही, अशा नराधमांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया यावेळी रविराज देशमुख यांनी दिली.

# मागणीत घट, पितृपक्षात फुलांचा बाजार कोमेजला

## अर्ध्यावर आल्या फुलांच्या किमती: नवरात्रोत्सवात मात्र परत भाव खाणार

विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती

गौरी,गणपती च्या वेळेस मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने भाव खाणाऱ्या फुलांना आता पितृपक्षात मागणी नाही. परिणामी सध्या फुलांचा बाजार मंदावला आहे. शिवाय, पावसाने परत आपला जोर वाढविल्यानेही फुलांचे दर कमी झाले आहे. आता पितृपक्षात फुलांचे दर कोसळले असले तरी पुढे नवरात्रोत्सवात परत एकदा फुल भाव खाणार आहेत.

सणवार, लग्नसराई वा कार्यक्रम असल्यास फुलांना मागणी असते. सध्या सणवार सुरू असून लग्नसराई नसली तरी काही ना कार्यक्रमांत सजावटीसाटी फुलांची गरज



पडतेच. यामुळे गौरी–गणपतीत फुलांना हार, वेण्या तसेच सजावटीसाठी चांगलीच मागणी होती. मात्र आता गणेशोत्सव संपला असून पितृपक्ष सुरू झाले आहे. पितृपक्षात शुभ कार्य होत नसल्याने सर्वच काही शांत आहे. परिणामी फुलांना मागणी ही राहिलेली नाही. यामुळेच गौरी–गणपतीत भाव खाणाऱ्या फुलांचे आता भाव उतरले आहेत. गौरी–गणपतीत झेंडू २०० रुपयांपर्यंत पोहोचला. तोच आता १२० रुपये किलो दराने बाजारात विकला जात आहे. हेचहाल अन्य फुलांचे झाले असून अर्ध्यावर त्यांचे भाव आले आहे. मात्र ही स्थिती जेमतेम पाच दिवसांसाठीच आहे. कारण, ३ ऑक्टोबरपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात होत असून फुलांना परत एकदा मागणी वाढणार असून त्यांचे भावही वाढणार आहेत.

### दरात चढ–उतार

९ सप्टेंबरपासून झेंडूच्या भावात चढ–उतार पाहायला मिळत आहेत. पितृपक्षात कोणत्याही प्रकारचे शुभ कार्य केले जात नाही. त्यामुळे, ग्राहकांनी फुले खरेदीकडे पाठ फिरविली आहे. पितृपक्षातील पंधरवडा संपल्यानंतर येणाऱ्या नवरात्रीत फुलांचे भाव पुन्हा वाढणार असल्याचे फुलविक्रेताने सांगितले.

### पावसाचाही परिणाम

जुलै ते सप्टेंबर या कालावधीत अनेक शेतकरी झेंडूसह अन्य फुलांचे उत्पादन घेतात. गणेशोत्सव काळात या फुलांना मागणी असल्याने भावदेखील मिळतो. शुभ कार्यात फुलांना जास्त मागणी असल्याने झेंडू २०० रुपये किलोपर्यंत पोहोचला होता. अनंत चतुर्दशीपासून फुलांची मागणी घटल्याने फुलांचे दर कमी झाले.

# उत्तमसरा शाळेची शाळा व्यवस्थापण समिति गठीत

## अध्यक्ष पदी रत्नदिप सवाई तर उपाध्यक्षपदी सौ.प्रिया मानकर यांची निवड

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८भातकुली

पंचायत समिती भातकुली मधिल जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा उत्तमसरा येथे नुकतीच पालक सभा घेण्यात आली.या पालक सभेतुन शाळा व्यवस्थापण समिती गठीत करण्यात आली. या सभेतुन अध्यक्ष पदी रत्नदिप सवाई तर उपाध्यक्षपदी सौ.प्रिया मानकर आणि सद् स्य म्हणुन बंडूभाऊ थोटे,सौ,वनिता जोगी,रविंद्र अळमाते यांची उपस्थित पालकांनी केली तसेच शिक्षण तंज्ञ अंगणवाडी सेविका श्रीमती अनुराधा भिंगारे,शाळेचे जेष्ट शिक्षक राजेश सावरकर,सचिव मुख्याध्यापिका श्रीमती मिनाक्षी इंगळे,विद्यार्थी प्रतिनिधी विनित



मांगे वर्ग ३रा व कु.कृष्णा मालधुरे वर्ग ४था यांची निवड करण्यात आली आणि स्थानिक प्राधिकर ग्रा.पं.प्रतिनिधी करीता ग्रामपंचायत प्रशासनाला पत्र देण्याचे ठरविण्यात आले. या सभेचे सुत्रसंचालन गजानन येलोने सर यांनी तर सभेची रुपरेषा प्रास्ताविक मधुन श्रीमती मिनाक्षी इंगळे यांनी सांगीतले आभार प्रदर्शन सौ.सुनिता अकर्ते मॅडम यांनी केले.नवनियुक्त व माजी अध्यक्ष,उपाध्यक्ष यांचा सत्कार करण्यात आला.सभेला कैलास रंगारी,विलास दहीकर,रत्नदीप सवाई,धमेंद्र राऊत,रविंद्र अळमाते, राहुल वर्धे,सविता जुनघरे,योगिता मावंदे,छाया पिंगे, निता सवाई,करिशमा शेंडे, दिपा बोरकर,रूपाली मालधुरे, अलका मानकर,वनिता जोगी,बुध्दमाला वासनिक,प्रिया मानकर,माधुरी सवाई,दिपाली निशाणदार,संगीता सवाई,अश्विनी पवार,विठ्ठलराव थोटे,मंगेश सायंके,शंकर मालवे उपस्थित होते.

# संजय राऊत यांना धर्मवीर आठवत नाहीत : ते नमाज पठणासाठी कुठे जातात हे शोधावे लागेल, भाजप खासदाराची जहरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २८ अमरावती**

संजय राऊत काय बोलतील याचा नेम नाही. त्यांचे धर्म परिवर्तन झाल्याने त्यांना धर्मवीर आठवत नाहीत. त्यांना औरंगजेब आणि टिपू सुलतान आठवत असतील. फक्त ते नमाज पठण करण्यासाठी कुठे जातात, हे शोधावे लागेल, अशी जहरी टीका भाजप खासदार अनिल बोंडे यांनी केली आहे. नागपूर येथील कोराडी संस्थानाला शासनाकडून अल्प दरात भूखंड मिळाल्यानंतर विरोधकांनी सरकारवर हल्लोबोल केला होता. यावरून अनिल बोंडे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

विरोधकांकडून सातत्याने हिंदू संस्थानांबाबत संभ्रम निर्माण केला जात आहे. नागपूरचे कोराडी संस्थान हे खूप जुने संस्थान असून अनेकांचे ते कुलदैवत आहे. ही संस्था विद्यार्थ्यांना केवळ एक रुपयांत शिक्षण देते. संजय



राऊत, नाना पटोले, अनिल देशमुख हे कोरोडी माते संदर्भात बोलत आहेत. ती यांची पण माता आहे. काँग्रेसच्या नेत्यांनी नागपुरात किती जमिनी हडप केल्या? सतीश चतुर्वेदी यांनी किती हेक्टर जमीन लाटली? असा सवाल करत इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये पैसे जमा करण्याचे काम त्यांच्याकडून सुरू आहे, अशी टीका अनिल बोंडे यांनी केली.

मुस्लिम संस्थाकडे दुर्लक्ष आणि समाजकार्य करणाऱ्या संस्थांवर आरोप

पुढे बोलताना अनिल बोंडे म्हणाले ही, माझ्याकडे मुस्लिम संस्थांची यादी आहे. त्या शैक्षणिक संस्था असून देखील तिथे आरक्षण लागू होत नाही. मात्र याकडे लक्ष दिले जात नाही. याउलट अन्नछत्र चालवणाऱ्या कोराडी मातेच्या संस्थानावर आरोप करतात. हे संस्थान एका कुटुंबाचे नाही. चंद्रशेखर बावनकुळे संस्थानाचे अध्यक्ष आहेत. दर दोन वर्षाला या अध्यक्षांची निवड केली जाते. याआधी दुसरे अध्यक्ष होते. तरीही या संस्थानाविरोधात खोटे आरोप करून बदनामी करत आहेत.

**संजय राऊत नमाज पठणासाठी कुठे जातात याचा शोध घ्यावा लागेल**

अनिल बोंडे यांनी संजय राऊत यांच्यावरही जहरी टीका केली आहे. संजय राऊत काय बोलतील हे सांगता येत नाही. त्यांचे धर्मपरिवर्तन झाल्यामुळे त्यांना धर्मवीर कधीच आठवणार नाही. त्यांना औरंगजेब आणि टिपू सुलतान आठवतील. ते नमाज पठणासाठी कुठे जातात, हे शोधावे लागेल, असे बोंडे म्हणाले.

**त्या महिलेला कुणी पाठवले होते का?**

एका महिलेकडून काल मंत्रालयातील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयात तोडफोड करण्यात आली. त्यावरही अनिल बोंडे यांनी भाष्य केले आहे. त्या महिलेचे दु:ख जाणून घेऊन तिचे समुपदेश करायला हवे. असे कृत्य करण्यासाठी तिला कुणी पाठवले होते का? याचा शोध मंत्रालय प्रशासनाने घ्यावा, असे बोंडे म्हणाले.

# जिल्हा बँकेच्या आमसभेत खडाजंगी

## उपविधी, भागभांडवलीच्या मुद्यावरून आरोपांच्या फैऱ्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

भागभांडवलामध्ये करण्यात आलेली वाढ तसेच बँकेच्या उपविधी दुरूस्तीच्या विषयावरील चर्चेदरम्यान आपल्याला बोलू दिले जात नसल्याच्या आरोप काही सभासदांनी केला. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शनिवारी (ता.२८) झालेल्या आमसभेत खडाजंगी झाली. अखेर आवाजी मतदानाने उपविधी मंजूर करण्यात आली.





जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या अध्यक्षतेखाली सभेला सुरुवात होताच बँकेच्या उपविधीमध्ये दुरुस्ती करण्याबाबत मुद्दा उपस्थित झाला. मात्र या मुद्दावर अद्याप सहकार विभागाकडून निकाल देण्यात आला नसून हे प्रकरण प्रविष्ट आहे, यावर चर्चा करण्यासाठी काही सभासद बोलण्यासाठी उभे राहीले, मात्र विषय मंजूर झाल्याचे सत्ताधाऱ्यांच्या व्यासपीठावरून सांगण्यात आले, मात्र आपल्याला बोलू दिले जात नसल्याचा आरोप सभासदांनी केला. त्यावर उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांनी या आमसभेत कुणालाही बोलण्यास मज्जाव केला नाही, असे स्पष्टीकरण दिले. बँकेच्या सभासदांच्या शेअर मध्ये एक हजारावरून १० हजारांपर्यंत वाढ करण्यात आल्याने काही सभासदांनी संताप व्यक्त केला. ही वाढ योग्य नसल्याचे काही सभासदांचे म्हणणे होते. या मुद्यावरून काहीसा गोंधळ सुद्दा झाला, मात्र हा विषय बँकेच्या विकासाशी संबंधित असल्याने तो मंजूर करण्यात येत असल्याचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी सांगितले. ग्रामीण भागात कार्यरत सेवासहकारी सोसायटच्यांची परिस्थिती सध्या वाईट असून बँकेकडून सोसायटच्यांना दोन टक्क्यांची मदत मंजूर करण्याची मागणी सुरेखा ठाकरे यांनी केली.

सभेला उपाध्यक्ष अभिजीत ढेपे, संचालक नरेशचंद्र ठाकरे, बबलू देशमुख, खासदार बळवंत वानखडे, प्रा. वीरेंद्र जगताप, दयाराम काळे, बाळासाहेब अलोणे, सुधाकर भारसाकळे, सुरेखा ठाकरे, जयप्रकाश पटेल, मोनिका मार्डीकर, चित्रा डाहाणे, श्रीकांत गावंडे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र बकाल उपस्थित होते.

**शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला मंजूरात**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यास या आमसभेत मंजूरी देण्यात आली. शहरात केवळ शिवटेकडीवरच शिवाजींचा पुतळा असून टेकडीवर ज्येष्ठ नागरिक किंवा तो पुतळा दुरून दिसत नाही त्यामुळे बँकेच्या आवारात महाराजांचा पुतळा बसविण्यात येणार आहे.

बँक प्रगतीपथावरजिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला आम्ही सत्तेवर आल्यापासून गतवैभव प्राप्त करूनदेण्याचा प्रयत्न केला असून कर्जवाटपाचे उद्दीष्ठ एप्रिलमध्येच पूर्ण केले आहे. एकही सभासद कर्जाशिवाय राहीला नसून बँक पाच कोटींनी नफ्यात आली आहे. शासनाच्या अनेक योजना बँकेमार्फत यशस्वीपणे राबविण्यात आल्या आहेत. नफ्यासोबतच ठेवींमध्ये सुदधा मोठी वाढ झाल्याचे बँकेचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू आणि उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांनी आपल्या संबोधनात सांगितले.

# तृतीया तिथीच्या वृद्धीने यंदा नवरात्रोत्सव दहा दिवसांचा

## ३ ऑक्टोबरला प्रारंभ देवीच्या नऊ रूपांची पूजा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

पितृपक्ष संपण्यापूर्वीच आता प्रत्येकांना नवरात्रोत्सवाचे वेध लागले आहे. नवरात्रोत्सव आता सर्वत्र मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. अश्विन महिन्यातील शुक्ल पक्षातील प्रतिपदेपासून नवरात्रोत्सवाला प्रारंभ होतो. यंदा नवरात्रोत्सवातील अर्थात, अश्विन शुक्ल तृतीया तिथीची वृद्धी झाल्याने नवरात्रोत्सव अर्थात, ९ दिवस आणि रात्रींचा सण १० दिवसांचा झाला आहे.

नवरात्र उत्सव हा महिलांच्या सबलीकरणाचा असतो. अन्यायाला प्रतिकार करण्याची शक्ती त्यांच्यामध्ये यावी, हा नवरात्रोत्सव साजरा करण्यामागचा हेतू असतो. नवरात्रीच्या नऊ दिवसांत देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. न देवीच्या ९ रूपांची पूजा करण्याचा हा दिवस वर्षातून चार वेळा साजरा केला जातो. अश्विन महिन्यातील नवरात्रीला शारदीय नवरात्र असे संबोधले जाते. हिंदू पंचांगानुसार यंदा अश्विन महिन्यातील शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथीला शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात होईल. गुरुवारी (दि. ३ ऑक्टोबर) घटस्थापना होऊन नवरात्रोत्सवारंभ होणार आहे. शनिवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी शारदीय नवरात्र संपन्न होणार आहे. त्यात सोमवार,दि. ७ ऑक्टोबर रोजी ललिता पंचमी आहे. बुधवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी सरस्वती आवाहन आहे. गुरुवार, दि. १० ऑक्टोबर रोजी रात्री महालक्ष्मी पूजन आहे. त्याच दिवशी सरस्वती पूजन आहे. २००० आणि २००६ या दोन वर्षांनाही नवरात्रोत्सव दहा दिवसांचे होते.

**अष्टमी, नवमीचे उपवास एकाच दिवशी**

यंदाच्या वर्षी महाष्टमी आणि महानवमीचे उपवास एकाच दिवशी शुक्रवार, दि. ११ ऑक्टोबरलाच करायचे आहेत. त्याच दिवशी सकाळी १९:४२ ते दुपारी १२:३० संधिकाल पूजा आहे. विजया दशमी-दसरा शनिवार, दि. १२ ऑक्टोबरला आहे. त्याच दिवशी सरस्वती विसर्जन आणि नवरात्रोत्थापन आहे.

**घटस्थापना मुहूर्त**

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी कलश स्थापनेचा शुभमुहूर्त आहे. यंदा हा मुहूर्त ३ ऑक्टोबरला सकाळी ६.१५ मिनिटांपासून ते ७ वाजून २२ मिनिटांपर्यंत असेल. घटस्थापनेसाठी अभिजीत मुहूर्त सकाळी ११ वाजून ४६ मिनिटे ते दुपारी १२ वाजून ३३ मिनिटांपर्यंत असेल.

### नवरात्र २०२४ नऊ दिवसांचे रंग

| | |
|---|---|
| ऑक्टोबर ३, २०२४, गुरुवार | नवरात्रीच्या रंग - पिवळा |
| ऑक्टोबर ४, २०२४, शुक्रवार | नवरात्रीच्या रंग - हिरवा |
| ऑक्टोबर ५, २०२४, शनिवार | नवरात्रीच्या रंग - करडा |
| ऑक्टोबर ६, २०२४, रविवार | नवरात्रीच्या रंग - नारिंगी |
| ऑक्टोबर ७, २०२४, सोमवार | नवरात्रीच्या रंग - पांढरा |
| ऑक्टोबर ८, २०२४, मंगळवार | नवरात्रीच्या रंग - लाल |
| ऑक्टोबर ९, २०२४, बुधवार | नवरात्रीच्या रंग - गहन निळा |
| ऑक्टोबर १०, २०२४, गुरुवार | नवरात्रीच्या रंग - गुलाबी |
| ऑक्टोबर ११, २०२४, शुक्रवार | नवरात्रीच्या रंग - जांभळा |

### नऊ दिवसांचे रंग हे केवळ आनंदासाठी

नवरात्रात कुठल्या रंगाचे वस्त्र परिधान करावे, हे कुठल्याही धर्मग्रंथात सांगितलेले नाही; परंतु नवरात्र उत्सव हा केवळ धार्मिक नसतो, तर तो सामाजिक, सांस्कृतिक असतो.

नवरात्रात महिलांनी एकाच रंगाची वस्त्रे नेसल्याने त्यांच्यात समानतेची, एकतेची आणि सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यास मदत होत असल्याने महिलावर्गाकडून गत काही वर्षांपासून नवरात्रोत्सवात नवीन ॲडिशन करण्यात आले असले, तरी धर्मग्रं- थांमध्ये त्याचा कुठेही उल्लेख नसल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

## शेतकऱ्याची सटकली... महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्यास ऑफिसमध्ये मारहाण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ लातूर**

शेतकरी आणि महावितरण यांचा सातत्याने संबंध येत असतो, कारण शेतीसाठी वीज हा अनिवार्य घटक बनला आहे. त्यामुळे, वीजेच्या अडचणीसंदर्भात शेतकरी महावितरण कार्यालयात खेटे मारतात, अनेकदा त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून केवळ आश्वासन दिलं जातं. पण, प्रत्यक्ष काम केलं जात नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचा संयम सुटून ते अरेरावी किंवा मारहाण करतात. तर, कधी शेतकरी देखील आपल्या कामासाठी अडून बसतात आणि वाद घालतात. आता, लातूर जिल्ह्यातील हाडोळती येथील महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्यास मारहाण केल्याची घटना घडली आहे. आजच्या तारखेत शेतातलं काम कर, अन्यथा मार खाशील असं म्हणत शेतकऱ्यांना मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. लातूर जिल्ह्यातील शेतकरी आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांमधील हा संवाद आणि मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हिडिओ व्हायरल झाला आहे. मारहाण करणाऱ्या विरोधात अहमदपूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

# नोव्हेंबरपर्यंत पैसे मिळतील पुढे पैसेच राहणार नाहीत : राज ठाकरे

## महिलांना सक्षम करायचे असेल तर उद्योग उभारायला हवे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

शासनाने आणलेल्या लाडकी बहीण योजनेतून नोव्हेंबर पर्यंत पैसे मिळतील. परंतु पुढे डिसेंबर, जानेवारीमध्ये मात्र सरकारच्या तिजोरीत पगाराला पैसे राहणार नाहीत. जर महिलांना सक्षम करायचे असेल तर उद्योग उभारणी करण्याची गरज आहे. सरकारकडे कोणीही फुकट काहीही मागत नसल्याचे राज ठाकरे म्हणाले. शनिवारी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना शासनाच्या चुकीच्या धोरणावर एकप्रकारे नाराजी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे शुक्रवारपासून अमरावतीमध्ये आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ते विदर्भातील प्रत्येक विधानसभा निहाय पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेत आहे. यावेळी त्यांनी माध्यमांशी अनोपचारीक संवाद साधला. ते म्हणाले शेतकऱ्यांनी कधीही राज्यात फुकट वीज मिळावी म्हणून आंदोलने केलेली नाहीत. परंतु तरीही सरकारने फुकट वीज देण्याचा निर्णय घेण्यात आला. सत्ताधारी आणि आज विरोधात असलेले तेही कधीतरी सत्तेत होते, त्यांना ज्या प्रकारची प्रश्न माध्यमांकडूनही विचाराणे अपेक्षित आहेत, तशी प्रश्न उपस्थित केली जात नाहीत. लाडकी बहीण योजनेतून ऑक्टोंबर, नोव्हेंबर पर्यंत पैसे महिलांना मिळतीलही परंतु त्यानंतर काय? जानेवारीत तर सरकारच्या तिजोरीत पगार द्यायला पैसेच उरणार नाहीत. त्यामुळे सक्षमीकरणासाठी उद्योग उभारायचे सोडून फुकट पैसे देण्याची सवयी काय लावताय असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

**पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साह आहे**

आढावा बैठकीमधून पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साह पहायला मिळत आहे. अनेकजण निवडणूक लढविण्यास तयार आहेत. तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये प्रवेश घेण्यासाठीही अनेक इच्छुक आहेत. तसेच या बैठकीमध्ये कोणाचीही उमेदवारी जाहीर होणार नसल्याचेही राज ठाकरे यांनी स्पष्ट केले.

# भाजपा अमरावती शहर शक्ती केंद्र व बूथ प्रमुख कार्यकर्ता संमेलन संपन्न

## कार्यकर्त्यांचा सन्मान व सत्कार हा नेहमीच झाला पाहिजे - प्रविण पोटे पाटील



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

भारतीय जनता पार्टी अमरावती शहर जिल्हा च्या वतीने भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांच्या नेतृत्वात अभियंता भवन येथे मा. ना. ऋषिकेशजी पटेल ( मंत्री, गुजरात सरकार ) यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय जनता पार्टी शक्ती केंद्र प्रमुख व बूथ प्रमुख कार्यकर्ता संमेलन संपन्न झाले. या संमेलनामध्ये भाजपा पक्षासाठी व संघटन मजबूत करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या मंडल अध्यक्ष, मंडल प्रभारी, शक्ती केंद्र प्रमुख व बूथ प्रमुख, मोर्चा अध्यक्ष व माजी नगरसेवक यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला तसेच विधानसभेच्या नियोजनार्थ बैठक घेऊन चर्चा सुद्धा करण्यात आली.



यावेळी . ना. ऋषिकेशजी पटेल यांनी येणाऱ्या निवडणुकांमध्ये सरकारच्या योजना तसेच केलेल्या कामांची माहिती प्रत्येकांपर्यंत पोहचवण्याचे आवाहन केले. तसेच अमरावती शहर भाजपा चे सर्व पदाधिकारी ,कार्यकर्ते यांची एकनिष्ठता व पक्षाचे संघटन मजबूत करण्याची तळमळ खरंच कौतुकास्पद आहे. कार्यकर्त्यांच्या मेहनीतच्या जोरावरच पक्ष एक नंबर ला असून येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये अमरावती शहर व जिल्ह्यात भाजपा व महायुतीचे उमेदवार नक्की निवडून येतील यात शंका नाही तसेच कार्यकर्त्यांचा सन्मान व सत्कार हा नेहमीच झाला पाहिजे असे प्रतिपादन यावेळी भाजप अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी केले.यावेळी जयंत डेहणकर, शिवराय कुलकर्णी, राजाभय्या पवार,चेतन पवार, दिनेश सूर्यवंशी, किरणताई महल्ले, किरण पातुरकर, रवीन्द्र खांडेकर, नितीन धांडे, सतीश करेसिया, विवेक कलोती, कु.अनिताताई राज,गंगाताई खारकर व मान्यवर मंडळी उपस्थित होते.